रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक १९५
www.ramprahar.com

◆ रविवार, १ फेब्रुवारी २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

जांभुळपाडा सरपंच, उपसरपंचासह कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश/२
रविप्रहरमध्ये विविध विषयांवरील लेख/४
मास्टर्स स्पर्धेत रायगडची नेत्रदीपक कामगिरी/८

## ‘किवीं’विरुद्ध इशानचे शतक; टीम इंडियाचा धावांचा डोंगर



**तिरुअनंतपूरम** : इशान किशनची शानदार सेंच्युरी (४३ चेंडूत सहा चौकार आणि १० षटकारांसह १०३ धावा), सूर्यकुमार यादवची कडक फिफ्टी (३० चेंडूत चार चौकार आणि सहा षटकारांनिशी ६३ धावा) अन् त्यानंतर हार्दिक पांड्याचा धमाकेदार शो (१७ चेंडूत एक चौकार आणि चार षटकारांसह ४२ धावा) याच्या जोरावर भारतीय संघाने न्यूझीलंडविरुद्धच्या सामन्यात निर्धारित २० षटकात ५ बाद २७१ धावा केल्या. न्यूझीलंडविरुद्ध कोणत्याही संघाने आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये केलेली ही सर्वोच्च धावसंख्या आहे. याआधी हा विक्रम ऑस्ट्रेलियाच्या नावे होता. २०१८मध्ये ऑस्ट्रेलियाने पाच विकेट्सच्या मोबदल्यात २४५ धावा केल्या होत्या. शिवम दुबेने डावातील अखेरच्या चेंडूवर मारलेल्या षटकारासह एका डावात सर्वाधिक २३ षटकार मारत टीम इंडियाने दक्षिण आफ्रिकेच्या विश्वविक्रमाचीही बरोबरी केली.

# सुनेत्रा पवार बनल्या राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री

## साधेपणाने शपथविधी





**मुंबई : प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बारामती येथे विमान दुर्घटनेत निधन झाल्यानंतर शनिवारी (दि. ३१) यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. त्या महाराष्ट्रातील पहिल्या महिला उपमुख्यमंत्री ठरल्या आहेत. दरम्यान, त्यांच्याकडे क्रीडा आणि युवक कल्याण, राज्य उत्पादन शुल्क आणि अल्पसंख्याक खाते देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

मोजक्या नेत्यांच्या उपस्थितीत अत्यंत साधेपणाने लोकभवनातील दरबार हॉलमध्ये शपथविधी झाला. राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी सुनेत्रा पवार यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. या कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मुख्य सचिव आणि राजशिष्टाचार अधिकारी उपस्थित होते.

सुनेत्रा पवार या शुक्रवारी रात्रीच बारामतीतून मुंबईकडे रवाना झाल्या होत्या. त्यानंतर शनिवारी सकाळपासून मुंबईत राजकीय घडामोडींना वेग आला. राष्ट्रवादीची गटनेतेपदाची बैठक विधीमंडळात झाली. या वेळी दिलीप वळसे-पाटील यांनी सुनेत्रा पवार यांच्या गटनेतेपदाचा प्रस्ताव मांडला. छगन भुजबळ यांच्याकडून नावाला अनुमोदन देण्यात आले. हा प्रस्ताव एकमताने मंजूर करण्यात आला.

यानंतर राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, छगन भुजबळ, धनंजय मुंडे, संजय बनसोडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन राष्ट्रवादीच्या नेत्यांनी गटनेते म्हणून सुनित्रा पवार यांची निवड झाल्याचे पत्र त्यांना दिले. यानंतर मुख्यमंत्र्यांकडून ते पत्र राज्यपालांना पाठवण्यात आले.

शपथविधी संध्याकाळी ५ वाजता पार पडला. या कार्यक्रमात सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. या वेळी सभागृहात राष्ट्रवादीच्या नेत्यांनी ‘अजित दादा अमर रहे’ अशा घोषणा दिल्या.

> *आदरणीय अजितदादांनी आयुष्यभर शेतकरी, कष्टकरी, महिला, युवक आणि वंचित घटकांसाठी जगण्याचा मंत्र दिला. आज त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत शिव-शाहू-फुले-आंबेडकर यांच्या विचारांवर निष्ठा ठेवून कर्तव्य भावनेने उपमुख्यमंत्रिपदाची जबाबदारी स्वीकारताना मन भरून येत आहे. दादांच्या अकाली जाण्याने मनावर दुःखाचा मोठा डोंगर कोसळला असला तरी त्यांनी शिकवलेली कर्तव्यनिष्ठा, संघर्षाची ताकद आणि जनतेप्रतीची बांधिलकी हाच माझा खरा आधार आहे. त्यांच्या स्वप्नातील न्यायप्रिय, समताधिष्ठित आणि विकसित महाराष्ट्र घडवण्यासाठी अखंड प्रामाणिकपणे काम करत राहीन. या कठीण क्षणी महाराष्ट्रातील जनतेने दिलेली साथ हेच माझे बळ आहे. आपल्या विश्वासाच्या जोरावर, दादांच्या विचारांना उजाळा देत नव्या आशेने पुढे चालत राहीन.*
>
> **-सुनेत्रा पवार,** उपमुख्यमंत्री



> *महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्रिपदाची धुरा सांभाळणाऱ्या सुनेत्रा पवार यांना त्यांच्या नवीन कार्यकाळासाठी हार्दिक शुभेच्छा! हे जबाबदारीचे पद भूषवणाऱ्या त्या राज्यातील पहिल्या महिला आहेत. त्या राज्याच्या जनतेच्या कल्याणासाठी अथक परिश्रम घेतील आणि दिवंगत अजितदादा पवार यांचे स्वप्न पूर्ण करतील, असा मला ठाम विश्वास आहे.*
>
> **-नरेंद्र मोदी,** पंतप्रधान

### असा आहे जीवन प्रवास

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचा जन्म १८ ऑक्टोबर १९६३ रोजी तेर (जि. धाराशिव) येथे झाला. माजी मंत्री पद्मसिंह पाटील यांची बहीण असलेल्या सुनेत्रा यांना राजकीय वारसा जन्मतःच लाभलेला होता. १९८५मध्ये त्यांचा विवाह अजित पवार यांच्यासोबत झाला. लग्नानंतर काटेवाडी (ता. बारामती) येथे आल्यावर त्यांनी सामाजिक कार्याला सुरुवात केली. गेल्या लोकसभा निवडणुकीत त्यांना पराभव पत्करावा लागला, पण त्या खचल्या नाहीत. जनसेवेत सक्रिय राहिल्यानंतर त्यांना राज्यसभेवर पाठवण्यात आले. राज्यसभा खासदार म्हणून काम करत असतानाच त्यांना तालिका अध्यक्षपदाची जबाबदारी मिळाली आणि आता स्व. अजित पवार यांच्या निधनानंतर त्या महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री बनल्या आहेत.

## वकिलांना प्रशिक्षणासाठी तळोजातील अकॅडमी महत्त्वाची ठरेल -मुख्यमंत्री

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलच्या वतीने स्थापन करण्यात आलेल्या भारतातील पहिल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अॅडव्होकेट ट्रेनिंग अँड रिसर्च सेंटर (अकॅडमी)चे उद्घाटन भारताचे माजी सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण आर. गवई यांच्या हस्ते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत शनिवारी (दि. ३१) पनवेलमधील तळोजा येथे झाले.

या वेळी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी ज्याप्रमाणे न्यायमूर्तींसाठी प्रशिक्षण अकॅडमी आहे, त्याप्रमाणे वकिलांसाठी प्रशिक्षण अकॅडमी का नाही याचे उत्तर आज बार कौन्सिलने दिले आहे. कायद्याचे शिक्षण आणि प्रत्यक्ष न्यायालयीन कामकाज (कोर्ट क्राफ्ट) यातील दरी भरून काढण्यासाठी ही अकॅडमी अत्यंत महत्त्वाची ठरेल, असे प्रतिपादन केले.

या सोहळ्याचे अध्यक्षस्थान मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर यांनी भूषविले. व्यासपीठावर मेघालय उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे, भारताचे अतिरिक्त सॉलिसिटर जनरल अॅड. अनिल सी. सिंग, महाराष्ट्राचे महाधिवक्ता डॉ. मिलिंद साठे आणि गोव्याचे महाधिवक्ता अॅड. देविदास पांगम यांची प्रमुख उपस्थिती होती. त्याचप्रमाणे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले की, राज्य सरकारने कायदेविषयक प्रशिक्षण आणि संशोधनाला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. महाराष्ट्र शासनाने दिलेल्या जागेचा अतिशय उत्तम उपयोग करून अतिशय कमी कालावधीत ही उत्कृष्ट वास्तू उभारली गेली आहे. **(पान २ वर..)**



## निवडक

### सोने, चांदीच्या दरात आता मोठी घसरण

**मुंबई** : गेल्या पंधरवड्यापासून विक्रमी तेजीचा झेंडा फडकावत असलेल्या सोने आणि चांदीच्या दरांना जोरदार धक्का बसला आहे. दोन दिवसांतच सोन्याच्या दरात तब्बल २० हजार रुपयांची, तर चांदीच्या दरात थेट एक लाख रुपयांची घसरण झाल्याने बाजारात खळबळ उडाली असून गुंतवणूकदारांचे धाबे दणाणले आहेत. काही दिवसांपूर्वी सोने पावणे दोन लाखांच्या आसपास, तर चांदी चार लाखांच्या ऐतिहासिक पातळीवर पोहचली होती, मात्र हीच तेजी आता तितक्याच वेगाने ओसरताना दिसत आहे.


### पिंपरी मनपातील भाजपच्या गटनेतेपदी प्रशांत शितोळे

**पुणे** : पिंपरी-चिंचवड महापालिकेतील भाजपच्या गटनेतेपदी प्रशांत शितोळे यांची निवड करण्यात आली आहे. भाजपचा गटनेता हा सभागृह नेता असणार आहे. त्यामुळे शितोळे हे सभागृह नेते असणार आहेत. पिंपरी-चिंचवड महापालिकेत दुसऱ्यांदा भाजपची एकहाती सत्ता आली आहे. भाजपने शनिवारी (दि. ३१) विभागीय आयुक्त कार्यालयात गटाची नोंदणी केली.

## नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला ‘दिबां’चे नाव देण्याबाबत केंद्र सरकार सकारात्मक

### लोकसभेत अधिकृत माहिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या नामकरणाबाबत पनवेल, उरण, नवी मुंबई आणि रायगडमधील तमाम भूमिपुत्रांच्या अस्मितेचा विजय झाला आहे. या विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव देण्याबाबतच्या प्रस्तावावर केंद्र सरकार सकारात्मक असून या संदर्भातील अधिकृत माहिती नुकतीच संसदेचे सभागृह असलेल्या लोकसभेत देण्यात आली.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे नामकरण लोकनेते दि.बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ असे करण्याबाबतचा अधिकृत प्रस्ताव महाराष्ट्र सरकारकडून प्राप्त झाला असल्याचे नागरी विमान वाहतूक मंत्रालयाने लोकसभेत स्पष्ट केले असून प्रकल्पग्रस्तांचे दिवंगत नेते दि.बा. पाटील यांचे नाव देण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि प्रकल्पग्रस्त भूमिपुत्रांनी अनेकदा तीव्र आंदोलन आणि पाठपुरावा केल्यानंतर ही एक महत्त्वाची घडामोड झाली आहे.

नवी मुंबईच्या शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीला योग्य मोबदला मिळावा यासाठी लोकनेते दि.बा. पाटील यांनी मोठा लढा दिला होता. या जमिनी महाराष्ट्राच्या सिटी अॅण्ड इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनकडून नियोजित नव्या शहराच्या उभारणीसाठी संपादित करण्यात आल्या. महाराष्ट्र मंत्रिमंडळाने २०२२मध्ये शिंदे-फडणवीस यांच्या भाजप शिवसेना सरकारने या विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव देण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली होती.

> *लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला मिळावे हा केवळ आमचा आग्रह नसून तो प्रत्येक भूमिपुत्राचा हक्क आहे. केंद्र सरकारने संसदेत दिलेली ही माहिती आपल्या लढ्याला मिळालेली महत्त्वाची पावती आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार स्थानिक जनतेच्या भावनांची कदर करत असून लवकरच यावर अधिकृत शिक्कामोर्तब होईल, असा आम्हाला विश्वास आहे.*
>
> **-प्रशांत ठाकूर,** आमदार

**संसदेच्या उत्तरातील महत्त्वाचे मुद्दे**

◆ प्रस्तावाचा स्वीकार : महाराष्ट्र राज्य विधिमंडळाने एकमताने मंजूर केलेला ठराव केंद्र सरकारला (नागरी विमान वाहतूक मंत्रालय) अधिकृतपणे प्राप्त झाला असल्याची पुष्टी करण्यात आली आहे.

◆ केंद्राची सकारात्मकता : केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे की, राज्याने पाठवलेल्या ’लोकनेते दि.बा. पाटील’ या नावाच्या प्रस्तावावर केंद्र सरकार सकारात्मक असून त्यावर पुढील प्रशासकीय प्रक्रिया सुरू आहे.

◆ प्रक्रिया अंतिम टप्प्यात : विमानतळाचे अधिकृत नामकरण ही एक निश्चित प्रशासकीय प्रक्रिया आहे. राज्य सरकारच्या प्रस्तावानंतर केंद्र सरकार आता यावर अंतिम तांत्रिक मोहोर उमटवण्याच्या तयारीत आहे.

## पनवेलच्या महापौर-उपमहापौरांची १० फेब्रुवारीला होणार निवड

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिकेच्या महापौर आणि उपमहापौरपद निवडीचा अधिकृत कार्यक्रम प्रशासनाकडून जाहीर करण्यात आला आहे. यासाठी १० फेब्रुवारी रोजी फडके नाट्यगृहात विशेष सभा बोलावण्यात आली असून या निवडणुकीत प्रथमच हात उंचावून मतदान प्रक्रिया राबवली जाणार आहे.



महापौर, उपमहापौरपदासाठी ६ फेब्रुवारी रोजी नामनिर्देशनपत्र सादर करावे लागेल. सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत महापालिका सचिवांच्या दालनात स्वतः उपस्थित राहून विहित नमुन्यातील अर्ज सादर करणे बंधनकारक आहे. त्यानंतर १० फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता निवडीसाठी विशेष सभा सुरू होईल.

सभेच्या सुरुवातीला अर्जाची कायदेशीर छाननी केली जाईल. पात्र उमेदवारांची नावे घोषित केल्यानंतर १५ मिनिटांचा वेळ उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी दिला जाईल. अर्ज मागे घेण्याची मुदत संपल्यावर प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रिया सुरू होईल. पीठासीन अधिकारी उमेदवारांची नावे वर्णानुक्रमाने पुकारतील. या वेळी प्रत्येक उमेदवारासाठी हात उंचावून मतांची नोंद घेतली जाईल. त्यानंतर पीठासीन अधिकारी तत्काळ निकाल घोषित करतील. महापौरपदाची निवड प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्याचपद्धतीने उपमहापौरपदाची निवडणूक होणार आहे.

## आज सादर होणार केंद्रीय अर्थसंकल्प

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



देशाच्या आर्थिक प्रगतीचा लेखाजोखा मांडणारा केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ रविवारी (दि. १) सादर होणार आहे. २९ जानेवारी रोजी संसदेत आर्थिक सर्वेक्षण सादर झाल्यानंतर आता सर्वांचे लक्ष अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या भाषणाकडे लागले आहे.

अर्थमंत्री सीतारामन रविवारी सकाळी ११ वाजता संसदेत बजेट मांडतील. हे बजेट अनेक अर्थांनी ऐतिहासिक ठरणार आहे. अर्थमंत्री सलग नवव्यांदा अर्थसंकल्प सादर करून नवा विक्रम प्रस्थापित करणार आहेत. मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील हा दुसरा अर्थसंकल्प असून आगामी वर्षात सरकारची आर्थिक धोरणे नेमकी कोणत्या दिशेने जाणार याचा स्पष्ट आराखडा यातून समोर येईल.

भारतीय संसदीय लोकशाहीत यंदा एक आगळीवेगळी घटना पहायला मिळणार आहे. साधारणपणे आठवड्यातील कामकाजाच्या दिवशी सादर होणारा केंद्रीय अर्थसंकल्प यंदा रविवारी मांडला जाणार आहे. भारताच्या इतिहासात असे पहिल्यांदाच घडत आहे. २०१७पर्यंत अर्थसंकल्प फेब्रुवारीच्या शेवटच्या दिवशी मांडला जात असे. तत्कालीन अर्थमंत्री अरुण जेटली यांनी

### देशवासीयांचे लक्ष

ही परंपरा बदलून १ फेब्रुवारी ही तारीख निश्चित केली होती. आता २०२६मध्ये रविवारी बजेट सादर करून नवा पायंडा पडत आहे. विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ आणि सामान्य नागरिकांच्या या अर्थसंकल्पाकडून मोठ्या अपेक्षा आहेत. त्यामुळे सुट्टीच्या दिवशी सादर होणाऱ्या या बजेटकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

अर्थमंत्र्यांकडून अर्थसंकल्पीय भाषण पूर्ण झाल्यानंतर सरकार हे बजेट लगेचच डिजिटल स्वरूपात उपलब्ध करून देते. indiabudget.gov.in या अधिकृत वेबसाइटला भेट देऊन बजेट डाउनलोड करता येईल. याशिवाय सर्व सरकारच्या युनियन बजेट मोबाइल अॅपवर सर्व कागदपत्रे पीडीएफ स्वरूपात उपलब्ध असतील.

### शेअर बाजार राहणार सुरू

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन अर्थसंकल्प सादर करणार असल्याने रविवारी (दि. १) शेअर बाजारातील व्यवहार नियमितपणे सुरू ठेवण्याचा निर्णय दोन्ही बाजार मंचांनी घेतला आहे. स्वतंत्र भारताच्या इतिहासात शेअर बाजार सुट्टीच्या दिवशी सुरू राहण्याची ही केवळ दुसरीच वेळ असेल. गेल्या वर्षी २०२५च्या अर्थसंकल्पाच्या वेळी बाजार शनिवारी सुरू होता, जे प्रमुख धोरणात्मक घटनांदरम्यान थेट बाजारात सहभागास परवानगी देण्याच्या दिशेने होत असलेल्या बदलाचे प्रतीक आहे. कमोडिटी बाजारही खुले राहतील.

## दिवेआगरमध्ये कारच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**श्रीवर्धन : प्रतिनिधी, बातमीदार**

दिवेआगर गावच्या हद्दीत मद्यधुंद कारचालकाने दुचाकीला दिलेल्या धडकेत एका व्यक्तीचा मृत्यू, तर त्याची पत्नी जखमी झाली आहे. हा अपघात शनिवारी (दि. ३१) दुपारी झाला.

कारचालक ऋषिकेश बाळासाहेब जोध (वय १९, रा. बाणेर, पुणे) याने दारूच्या नशेत वाहन चालवून दुचाकीला धडक दिली. या अपघातात दुचाकी चालवणारे महमद हानीफ मुझफ्फर अर्जबेगी (वय ५३) यांचा मृत्यू झाला असून पत्नी सिमीन महमद हानीफ अर्जबेगी (वय ४५, रा. शेखाडी) जखमी झाली. या प्रकरणी कारचालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

**(सविस्तर वृत्त पान २ वर..)**

## जंगलात लपवलेला नक्षल्यांचा शस्त्रसाठा जप्त

**गोंदिया : प्रतिनिधी**



महाराष्ट्र-मध्य प्रदेश-छत्तीसगड झोनमधील बेस कॅम्प मुरकूटडोह भागातील टाकेझरी-बेवारटोला डॅम जंगल परिसरातून नक्षलवाद्यांनी लपविलेला शस्त्रसाठा आणि स्फोटके गोंदिया पोलिसांनी हस्तगत केली आहे. आत्मसमर्पित नक्षलवाद्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारावर राबविलेल्या अभियानात एके-४७, एसएलआरसह अनेक शस्त्रे व स्फोटक साहित्य सापडल्याची माहिती गोंदिया पोलिस दलाने दिली.

२८ नोव्हेंबर २०२५ रोजी एमएमसी झोनचे प्रवक्ता व एसझेडसीएम अनंत ऊर्फ विकास नवज्योत नागापूरे याने १० साथीदारांसह, तर १३ डिसेंबर २०२५ रोजी दरेकसा एरिया कमिटी कमांडर रोशन बेडजा याने दोन साथीदारांसह आत्मसमर्पण केले होते. जीआरबी डिव्हिजनमधील दरेकसा एरिया कमिटीजवळील एकूण १४ नक्षलवाद्यांनी गोंदिया पोलिसांसमोर आत्मसमर्पण केले. या नक्षलवाद्यांनी दिलेल्या माहितीवरून गोंदिया पोलिसांनी मुरकूटडोह भागातील टाकेझरी-बेवारटोला डॅम जंगल परिसरात छापा टाकला. यात माओवाद्यांनी भूमिगत केलेला शस्त्रसाठा सापडला. हा शस्त्रसाठा हस्तगत केल्यामुळे मोठ्या घातपाती कारवायांना वेळेत आळा बसला असून जिल्ह्यातील नक्षल नेटवर्कला जबर धक्का बसला आहे.

# जांभुळपाडा सरपंच, उपसरपंचासह अनेक कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये जाहीर प्रवेश



**पाली : प्रतिनिधी**

भाजपत एका पाठोपाठ एक पक्षप्रवेश होत असून जांभूळपाडा ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच, सदस्यांसह अनेक कार्यकर्त्यांनी शनिवारी (दि.३१) भाजप दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष तथा खासदार धैर्यशील पाटील, भाजप नेते प्रकाश देसाई, माजी जिल्हा माजी जिल्हा परिषद अध्यक्ष अॅड: निलिमा पाटील, मिलिंद देशमुख, रवींद्र देशमुख, भाजप तालुकाध्यक्ष श्रीकांत ठोंबरे यांच्या प्रमुख उपस्थितीत पक्षप्रवेश केला आहे.

धडाडीचे कार्यकर्ते गिरीश गोविंद दळवी यांच्या नेतृत्वात जांभुळपाडा ग्रामपंचायतीचे सरपंच पांडुरंग लिंबाजी शेंडे, उपसरपंच अरुणा गिरीश दळवी, सदस्य प्रभाकर खंडागळे, सुशील मालुसरे, सविता बामगुडे, सुषमा वाघमारे, रमेश गौरू पवार, मनीषा गोरे, धोंडी पवार आदींसह शिवसेना कार्यकर्ते राजेश शितोळे, धनंजय काकडे, योगेश खंडागळे, सुरेश चव्हाण, सुश्रेश अधिकारी, रघुनाथ खंडागळे, प्रबंजन खंडागळे, बाबू गोरे, संतोष शितोळे, शेखर जोरकर, ऋतिक पुजारी, प्रसाद गिरी, सचिन बाम गुडे, विशाल देशमुख, मोतीराम वाघमारे आदींनी प्रवेश केला.

या वेळी खासदार धैर्यशील पाटील म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सक्षम व कुशल नेतृत्वात जनतेला अपेक्षित व अभिप्रेत विकास भाजप पक्ष करीत असून याच विश्वासाने जनता भाजपमध्ये सहभागी होत आहे.

या पक्षप्रवेशास अॅड. निलीमा पाटील, मिलिंद देशमुख,रवींद्र देशमुख, सतीश देसाई, अॅड: सुभाष पाटील, पिठू डुमना, नरेश खाडे, विलास पालवे, गिरीश दळवी, विशाल गुरव, संदेश लोंढे आदींसह भाजप नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दिवेआगर येथे पुन्हा एक जीवघेणा अपघात

# दारूच्या नशेत कारचालकाची दुचाकीला धडक; एकाचा मृत्यू

**श्रीवर्धन : प्रतिनिधी, बातमीदार**

श्रीवर्धन तालुक्यात रस्ते अपघातांची मालिका थांबण्याचे नाव घेत नसून दारू पिऊन वाहन चालविण्याच्या निष्काळजीपणामुळे तिसऱ्यांदा निष्पाप नागरिकांचा बळी गेला आहे. काही दिवसांपूर्वी श्रीवर्धन येथे एका नामवंत व्यक्तीचा अपघाती मृत्यू, त्यानंतर हरिहरेश्वर येथे एका महिलेला जीव गमवावा लागलेली घटना ताजी असतानाच दिवेआगर येथे पुन्हा एक जीवघेणा अपघात घडला आहे.



शनिवार, ३१ जानेवारी २०२६ रोजी दुपारी सुमारे १ वाजण्याच्या सुमारास दिवेआगर गावच्या हद्दीत माउली हॉटेलजवळ हा भीषण अपघात घडला. फिर्यादी खलील मोहिद्दीन दाते (वय ६५, रा. करलास, ता. श्रीवर्धन) यांचे मावस भाऊ महमद हानीफ मुझफ्फर अर्जबेगी (वय ५३) आणि वहिनी सिमीन महमद हानीफ अर्जबेगी (वय ४५) हे आपल्या (एमएच ०६ सीएस ६७२३) मोटरसायकलवरून शेखाडी-दिवेआगर-बोर्लीमार्गे घरी जात असताना दिवेआगर बाजूकडून येणाऱ्या सफेद रंगाच्या स्वीफ्ट डिझायर कार (एमएच १२ डब्लूएक्स २१८६)ने त्यांच्या दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिली व फरपटत नेले.

ही कार ऋषिकेश बाळासाहेब जोध (वय १९, रा. बाणेर, पुणे) हा चालक दारूच्या नशेत अतिवेगाने, बेदरकारपणे व निष्काळजीपणे चालवत असल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट झाले आहे. या भीषण धडकेत महमद हानीफ अर्जबेगी यांना डोके, चेहरा, हात-पायाला गंभीर दुखापती होऊन त्यांचा मृत्यू झाला, तर सिमीन अर्जबेगी या गंभीर जखमी अवस्थेत उपचार घेत आहेत. या प्रकरणी दिघी सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून कारचालकाला ताब्यात घेण्यात आले आहे. अधिक तपास सुरू आहे.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयाची सातारा येथील कॉलेजमध्ये औद्योगिक भेट

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील कॉम्प्युटर सायन्स व माहिती तंत्रज्ञान विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि.३१) सातारा येथील कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिक महाविद्यालय येथे यशस्वीरीत्या औद्योगिक भेट झाली.




या औद्योगिक भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) या आधुनिक व महत्त्वाच्या तंत्रज्ञानाविषयी सखोल माहिती देण्यात आली. या भेटीमध्ये तज्ज्ञ प्राध्यापकांनी तसेच दोन्ही विभागातील ७० विद्यार्थिनींनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रत्यक्ष उपयोग, त्याचे विविध क्षेत्रांमधील महत्त्व, भविष्यातील संधी तसेच उद्योगांमध्ये त्याचा होणारा वापर याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांनी या मार्गदर्शनाचा लाभ घेत प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून आपले ज्ञान अधिक वृद्धिंगत केले. या औद्योगिक भेटीमुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक अभ्यासासोबतच प्रत्यक्ष औद्योगिक वातावरणाचा अनुभव मिळाला. त्यामुळे त्यांच्या तांत्रिक ज्ञानात भर पडली असून आधुनिक तंत्रज्ञानाविषयीची जाणीव अधिक दृढ झाली आहे. ही भेट विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त, माहितीपूर्ण व ज्ञानवर्धक ठरली.

या यशस्वी औद्योगिक भेटीसाठी माहिती तंत्रज्ञान व संगणकशास्त्र विभागाने विशेष परिश्रम घेतले असून अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होत असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी या शैक्षणिक उपक्रमाचे आयोजन केल्याबद्दल दोन्ही विभागातील सर्व प्राध्यापक विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी यांचे अभिनंदन केले. या उपक्रमाचे आयोजन प्रा. रिजवाना मोमीन व प्रा. राजश्री म्हात्रे यांनी केले तसेच दोन्ही विभागातील इतर सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी यांनी सहकार्य केले.

# शिवसेना कामगार सेनेकडून स्व. अजित पवार यांना आदरांजली

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

शिवसेना - कामगार सेनेच्या वतीने वाशी येथील कामगार नाका येथे कामगारांच्या वतीने दिवंगत अजित पवार यांच्या श्रद्धांजली सभेचे आयोजन शनिवारी (दि.३१) करण्यात आले होते. शिवसेना कामगार सेनेचे नवी मुंबई अध्यक्ष प्रदीप वाघमारे, माजी नगर सेवक मनोहर जोशी आणि उपजिल्हा प्रमुख दीपक सिंग यांच्या पुढाकारणे श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते.



या वेळी माजी. नगरसेवक मनोहर जोशी आणि उपजिल्हा प्रमुख दीपक सिंग यांनी स्व.अजित पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. कामगार सेना जिल्हाध्यक्ष कामगार नेते प्रदीप बी. वाघमारे यांनी अजितदादा पवार हे खऱ्या अर्थाने जनतेची कामे करणारा कामाचाच माणूस होता हे सांगितले. कधीच जातीपातीचे राजकारण न करता सर्वांना सोबत घेऊन चालणारे आणि काम कसे होईल हा एकच विचार करून प्रत्येकाच्या कामाला आपण पडले पाहिजे हाच त्यांचा ध्यास होता. महाराष्ट्राच्या जडणंघडणीत आणि नवी मुंबईतील अनेक प्रकल्प मार्गी लावण्यात अजित पवार यांचा सिंहाचा वाटा असल्याचे प्रदीप वाघमारे यांनी सांगितले.


या वेळी नामदेव भगत, दिलीप घोडेकर, सचिन नाईक, वैभव गायकवाड, रामबाशिष्ट जैसवाल, दर्शन भणगे, अंजना भोईटे, काँग्रेसचे बाळकृष्ण बैले, रिपाईचे अभिमान जगताप इत्यादी उपस्थिती झाले होते. उपस्थितांनी अजित पवार यांना श्रद्धांजली वाहून आठवणी जगावल्या.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राजू घोडे, राजेश पारवे,अनिल रनबावळे, कृष्णा घाटोळे, राहुल तांबे, विष्णू तांबे, अर्जुन देवकुळे, नामदेव घोडे, कृष्णा घोडे आदी कामगार प्रतिनिधी, कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# फुंडे विद्यालयाचे गांधी विचार संस्कार परीक्षेत घवघवीत यश

**उरण : रामप्रहर वृत्त**

फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथील विद्यार्थ्यांनी गांधी रिसर्च फाउंडेशन यांच्या मार्फत घेण्यात आलेल्या गांधी विचार संस्कार परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे.



या परीक्षेत शेजल केसरी साहू, परिंगे हर्षिका देविदास, ससाणे सिद्धिका लक्ष्मण, साना शमीम मन्सुरी यांनी सुवर्णपदक प्राप्त केले. चदाना शांती केसरसिंह, घरत समीक्षा विलास यांना रौप्यपदक, तर पवार आदित्य दत्तात्रेय याला कास्यपदक प्राप्त झाले.

यशस्वी विद्यार्थ्यांना ज्युनिअर कॉलेज गांधी विचार संस्कार परीक्षा प्रमुख प्रा. श्वेता जैन व माध्यमिक विभागाचे परीक्षा प्रमुख दिगंबर पाटील यांनी मार्गदर्शन केले. यशस्वी विद्यार्थ्यांचे स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन कृष्णाजी कडू, प्राचार्य बबन साळुंखे, उपमुख्याध्यापिका संगीता थोरात, पर्यवेक्षिका संगीता बाबर, सुप्रिया पाटील, दि रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक प्रा. किशोर पाटील, जुनिअर कॉलेज विभाग प्रमुख प्रा. बाबूलाल पाटोळे, सायन्स विभागप्रमुख प्रा. झुंजार माने, कॉमर्स विभागप्रमुख प्रा.ऋषिकेश धुरी माध्यमिक विभागाचे ज्येष्ठ शिक्षक सदानंद म्हात्रे, हरेश पाटील कार्यालयीन प्रमुख नितीन म्हात्रे, नवनीत ठाकूर, प्रतीक वर्तक तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवकांनी अभिनंदन करून विद्यार्थ्यांचा सन्मान केला.

# आमदार मंदा म्हात्रेंकडून पवार कुटुंबियांचे सांत्वन

**नवी मुंबई : बातमीदार**

आमदार मंदा म्हात्रे यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांच्या बारामती येथील सहयोग बंगल्यावर भेट देऊन या दुःखाच्या अत्यंत कठीण क्षणी पवार कुटुंबीयांच्या वेदनेत सहभागी होत त्यांचे सांत्वन केले.



दूरदृष्टी, ठाम भूमिका आणि कणखर नेतृत्व यांचादुर्मीळ संगम असलेले अजितदादा पवार यांचे अकाली जाणे संपूर्ण राज्यासाठी अत्यंत वेदनादायक व धक्कादायक आहे. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राच्या राजकीय जीवनातील जनतेचा हक्काचा 'दादा' कायमचा हरपला असून, त्यामुळे निर्माण झालेली पोकळी कधीही भरून न निघणारी आहे. राज्याच्या विकासासाठी त्यांनी दाखवलेली अतूट तळमळ, निर्णयक्षम नेतृत्व आणि कामाविषयीची काटेकोर शिस्त कायम स्मरणात राहील. कोणतीही तडजोड न करणारे, प्रशासनावर भक्कम पकड असलेले आणि जनतेच्या हितासाठी अखंडपणे झटणारे हे कर्तृत्ववान नेतृत्व आज आपल्यातून निघून गेले आहे, असे मंदा म्हात्रे यांनी अशा भावना व्यक्त केल्या.

आमदार मनीषा चौधरी, आमदार सीमा हिरे, आमदार सुलभा गायकवाड, आमदार देवयानी फरांदे, माजी आमदार भारती लवेकर उपस्थित होत्या.

# उरण महाविद्यालयात हुतात्मा दिन

**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील इतिहास विभागाच्या वतीने महाविद्यालयात हुतात्मा दिन साजरा करण्यात आला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाल्मीक गर्जे यांनी महात्मा गांधीजी यांच्या प्रतिमेचे पूजन पुष्पहार अर्पण करून केले. उपस्थितांचे आभार इतिहास विभाग प्रमुख डॉ.ए.जी.लोणे यांनी व्यक्त करताना गांधीजींच्या स्वातंत्र्य लढ्यातील योगदानावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक डॉ. दत्ता हिंगमिरे यांनी केले.

या वेळी आय.क्यु.ए.,सी समन्वयक डॉ.ए.आर.चव्हाण, ज्येष्ठ प्रा.व्ही. एस. इंदुलकर, डॉ.एच. के.जगताप, डॉ. ए.के गायकवाड, डॉ.अनुपमा कांबळे, प्रा. आर. टी. ठावरे आदी मान्यवर उपस्थित होते. या वेळी उपस्थित विद्यार्थ्यांनी गांधी संस्कार परीक्षेच्या माध्यमातून गांधीजींच्या जीवन विचारांचे चिंतन केले.



## पान १ वरुन

# वकिलांना प्रशिक्षणासाठी तळोजातील अकॅडमी महत्त्वाची ठरेल -मुख्यमंत्री

अकॅडमीच्या इमारतीचे दर्जेदार आणि अल्पावधीत पूर्ण झालेले बांधकाम हे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कार्यशैलीची आठवण करून देणारे असल्याचे सांगून त्यांना या वेळी श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. वकिलांसाठी स्वतंत्र प्रशिक्षण अकॅडमी सुरू करण्याचा निर्णय हा देशातील पहिलाच निर्णय असून बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्रने घेतलेल्या पुढाकाराचे त्यांनी विशेष कौतुक केले.

बदलते कायदे, नवीन फौजदारी कायदे तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) व तंत्रज्ञानाचा योग्य वापर करण्यासाठी प्रशिक्षित वकील आणि अभियोजक तयार करणे आवश्यक असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगून अकॅडमीसाठी राज्य शासनाकडून १० कोटी रुपयांचे अनुदान आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनानंतर वितरित केले जाईल, असेही जाहीर केले. विस्तारित अर्थव्यवस्थेनुसार तंत्रज्ञानातील बदलांशी अनुरूप आपली यंत्रणा प्रशिक्षित करणे गरजेचे आहे. पिटिशन ड्राफ्टिंगसाठी एआयचा उपयोग करताना होणाऱ्या धोक्यांबाबतही सतर्क राहायला हवे. संशोधनाशिवाय गुणवत्ता येत नाही. त्यामुळे हे रिसर्च सेंटर भविष्यात दर्जेदार कायदेविषयक संशोधनाचे केंद्र बनेल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी या वेळी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक वरिष्ठ वकील तथा बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवा (बीसीएमजी)चे अध्यक्ष हर्षद निंबाळकर यांनी केले. या वेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते विधी महर्षी पुरस्कार न्यायमूर्ती बी.बी. चव्हाण यांना प्रदान करण्यात आला, तर अमरावतीचे दिवाणी वकील ज्ञानेश्वर बावरेकर यांचा मरणोत्तर पुरस्कार त्यांचे पुत्र अॅड. संजय बावरेकर यांनी स्वीकारला.

या सोहळ्याला बीसीएमजीचे उपाध्यक्ष अॅड. जयंत जायभावे, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अॅडव्होकेट ट्रेनिंग अँड रिसर्च सेंटरचे (बीबीएटीआरसी) अध्यक्ष अॅड. डॉ. उदय पी. वारुंजीकर, बार कौन्सिल ऑफ इंडियाचे (बीसीआय) सदस्य अॅड. आशिष देशमुख आणि समन्वयक व उपाध्यक्ष अॅड. संग्राम देसाई उपस्थित होते. त्याचप्रमाणे बार कौन्सिलचे सदस्य अॅड. मोतीसिंह मोहता, अॅड. गजानन चव्हाण, अॅड. मिलिंद पाटील, अॅड. वसंत साळुंखे, अॅड. मिलिंद थोबडे, अॅड. अविनाश भिडे, अॅड. वसंतराव भोसले, अॅड. अनिल गोवर्दिपे, अॅड. विवेकानंद घाटगे, अॅड. आसिफ कुरेशी, अॅड. अविनाश आव्हाड, अॅड. अमोल सावंत, अॅड. अण्णाराव पाटील, अॅड. सतीश देशमुख, सीनिअर अॅड. सुदीप पासबोला, अॅड. सुभाष घाटगे, अॅड. विठ्ठल कोंडे-देशमुख, अॅड. अहमदखान पठाण, अॅड. राजेंद्र उमाप, अॅड. पारिजात एम. पांडे यांचीही विशेष उपस्थिती लाभली.

# आई फाऊंडेशनतर्फे आदिवासी विद्यार्थ्यांना खाऊवाटप




**उरण : बातमीदार**

आई फाउंडेशन या सामाजिक संस्थेने समाजातील सर्वात वंचित घटक असलेल्या आदिवासी पाड्यांवरील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांसाठी खाऊवाटप करण्यात केले. विंधणे आदिवासी वाडी, पिरवाडी आदिवासी वाडी, कोप्रोली आदिवासी वाडी, येथील शाळांमधील लहानग्यांच्या चेहऱ्यावर खुललेले आनंदी हास्य हेच या उपक्रमाचे खरे यश ठरले.

दिव्यांग व्यक्तींनी स्वतःच्या अडचणींवर मात करत समाजासाठी उभे राहण्याचा घेतलेला हा निर्धार खऱ्या अर्थाने प्रेरणादायी आहे. आई फाउंडेशन ही संस्था दिव्यांग बांधव तसेच आदिवासी व वंचित घटकांच्या उत्कर्षासाठी मार्गदर्शन, सहकार्य आणि सामाजिक भान जागृत करण्याचे सातत्याने कार्य करत आहे. संस्थेने यापूर्वीही पूरग्रस्तांना मदत, उरणमधील गरजू दिव्यांगांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप, दिव्यांग बांधवांना वेळोवेळी मार्गदर्शन असे अनेक समाजोपयोगी उपक्रम राबवले आहेत. या वेळी खाऊवाटपासोबतच प्रत्येक वाडीतील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी सहकार्य करण्याची भावना संस्थेच्या वतीने व्यक्त करण्यात आली.

संस्थेच्या प्रतिनिधींनी भावनिक शब्दांत सांगितले की, दिव्यांगत्व ही मर्यादा नाही, तर जिद्द, आत्मविश्वास आणि सेवाभावाची ओळख आहे. आम्ही मदत करत नाही, आम्ही नातं जोडतो. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे मदन पाटील (अध्यक्ष), राजेंद्र पाटील (उपाध्यक्ष), रणिता ठाकूर (सचिव), महेश पाटील (खजिनदार), सदस्य उमेश पाटील, संदेश राजगुरू, योगेश पाटील, नितीन सांगवीकर, राकेश पाटील यांनी अथक परिश्रम घेतले. तसेच रामकृष्ण थळी (पिरवाडी आदिवासी वाडी), कल्पेश ठाकूर (कोप्रोली वाडी), नरेश पाटील आणि रमण पंडित (विंधणे आदिवासी वाडी) या शिक्षकांचे सहकार्य लाभले. याशिवाय गणेश पाटील (अध्यक्ष, ग्रामस्थ मंडळ दादरपाडा) चंद्रकांत पाटील (सहव्यवस्थापक, एच.ओ.सी. कंपनी, रसायनी) यांचेही मोलाचे योगदान लाभले.

हा कार्यक्रम समाजाला एक सुंदर संदेश देऊन गेला-मानवतेची खरी ओळख मदतीत नसून, समानतेच्या भावनेत आहे. आई फाउंडेशन पुढील काळातही शिक्षण, मार्गदर्शन व सामाजिक उन्नतीसाठी असेच उपक्रम राबवत राहणार आहे, असे मत संस्थेच्या प्रत्येक शिलेदारांनी व्यक्त केले.

## दुखवटा

### वसंत शाह



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतमधील किराणा मालाचे व्यापारी वसंत लिलाचंद शाह यांचे ७५व्या वर्षी अल्पशा आजाराने आंबेजोगाई येथे निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

शाह हे एका राष्ट्रीय बँकेत नोकरी करीत होते. तेथे काम करण्यास त्यांचे मन लागत नव्हते. त्यामुळे त्यांनी नोकरीचा राजीनामा देऊन किराणा मालाचे दुकान सुरू केले व ते एक प्रसिद्ध व्यापारी म्हणून नावारूपास आले. त्यांच्या निधनाबद्दल व्यापारी वर्गाने शोक व्यक्त केला आहे.

## निवडक

### खारघर वसाहतीतून एकजण बेपत्ता

**पनवेल :** खारघर वसाहतीतील सेक्टर १२ ब्रिस्टो हॉटेल येथून कल्याणला बहिणेकडे जातो असे सांगून एक



व्यक्ती तो बाहेर निघाला तो अद्याप परत न आल्याने तो हरवल्याची तक्रार खारघर पोलिसांकडे दाखल करण्यात आली आहे. बेपत्ता व्यक्तीचे नाव हे सुरेशसिंग चैतसिंग राणा (वय ४१ वर्षे) असून अंगाने मध्यम रंगाने काळा उंची ५.२ फुट, केस काळे, नाक सरळ, अंगात हॉटेलचा ड्रेस बारउन शर्ट, ब्राऊन रंगाची पॅन्ट, पायात पांढऱ्या रंगाचे शुज घातलेले आहे, त्याला हिंदी गडवाली भाशा येथे या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास खारघर पोलीस ठाणे किंवा पोहवा नितीन आखाडे यांच्याशी संपर्क साधावा.

### अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळला

**पनवेल :** एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह पनवेल शहर परिसरात आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर करीत आहेत. अनोळखी व्यक्तीचे अंदाजे वय ४५ ते ५० वर्षे, रंग सावळा, उंची अंदाजे पाच फुट, पाच इंच, चेहरा उभट, अंगाने मध्यम, डोक्याचे केस काळे, दाढी वाढलेली मिशीचे केस काळे वाढलेले, अंगात नेसुन मळकट चॉकलेटी रंगाचा फुलबाहयाचा शर्ट, निळ्या रंगाची मळकट जिन्स पॅन्ट अशा वर्णनाचा पुरूष इसम आहे. याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पोलीस उप निरीक्षक अनंत परांगे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# वायू व ध्वनी प्रदूषणप्रकरणी बांधकाम प्रकल्पांवर कारवाई

## नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ३४ प्रकल्पांवरील बांधकामांना स्थगिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशानुसार तसेच पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांनी दिलेल्या निर्देशानुसार पनवेल महानगरपालिका हद्दीतील बांधकाम प्रकल्पांवर वायू प्रदूषण, ध्वनी प्रदूषण व पर्यावरणीय नियमांच्या उल्लंघनाबाबत व्यापक तपासणी करून कारवाई करण्यात आली. स्थळपाहणी अहवालानुसार एकूण ३४ बांधकामस्थळांवर कठोर कारवाई करण्यात आली असून सदर प्रकल्पांचे काम तात्काळ थांबविण्यात आले आहे.



यापूर्वी महापालिकेच्या वतीने एकूण १६९ बांधकाम प्रकल्पांना / स्थळांना उपाययोजना करणेबाबत अथवा काम बंद करणेबाबाबत इशारावजा जाहीर नोटीस देण्यात आलेली होती. संबंधित बांधकाम व्यावसायिकांना नोटीसा बजावण्यात आल्यानंतरही काही व्यवसायिकांनी अपेक्षित कार्यवाही न केल्याचे दिसून आले. त्यानंतर महानगरपालिकेच्या पथकाने पुन्हा एकदा प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून नियमांचे पालन होत आहे की नाही, याची तपासणी केली. तपासणीदरम्यान अनेक ठिकाणी धूळ नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना न करणे, बांधकाम साहित्य खुले ठेवणे, बांधकामाच्या ठिकाणी प्रदूषण करणाऱ्या साहित्यावर नियमाप्रमाने पाणी न शिंपडणे, वाहन स्वच्छता न करणे, तसेच ब्लास्टिंग करतानाच्या मानक कार्यपद्धती (SOP) चे पालन न करणे आदी गंभीर बाबी निदर्शनास आल्या.

कारवाईदरम्यान संबंधितांना तात्काळ सुधारात्मक उपाययोजना करण्याचे आदेश देण्यात आले असून, नियमांचे उल्लंघन सुरूच राहिल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

नागरिकांचे आरोग्य, स्वच्छ हवा व पर्यावरण संरक्षण याबाबत पनवेल महानगरपालिका कटिबद्ध असून, यापुढेही अशा प्रकारच्या तपासण्या व कारवाई नियमितपणे सुरू राहणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

**विभागनिहाय कारवाई**

कळंबोली विभाग – १० बांधकाम प्रकल्प, कामोठे विभाग – ०९ बांधकाम प्रकल्प, नवीन पनवेल / पनवेल विभाग – १५ बांधकाम प्रकल्प, एकूण : ३४ बांधकाम प्रकल्पांवर कारवाई

**स्थळपाहणी अहवालानुसार बांधकामस्थळांनी पूर्तता न केलेल्या बाबी :**

१) विकासकांनी बांधकाम प्रकल्पांच्या भोवती किमान २५ फूट उंचीचे धातूचे पत्रे लावण्यात आल्याचे दिसून येत नाही., २) बांधकाम चालू असणाऱ्या सर्व इमारतींच्या भोवती ओल्या हिरव्या कापडाने/ओल्या तागाच्या कापडाने/ताडपत्रीने बंदिस्त करण्यात आल्याचे दिसून येत नाही., ३) बांधकामच्या ठिकाणी वॉटर स्प्रिंकलर/स्मॉग गन द्वारे सतत फवारणी करण्यात आल्याचे दिसून येत नाही. ४) बांधकाम जागेवरील हवेमध्ये प्रदूषण करणाऱ्या भंगार/पाडकाम साहित्यावर पाणी शिंपडण्यात आल्याचे दिसून येत नाही. ५) बांधकाम साहित्य तसेच रेडी मिक्स कॉंक्रीट वाहून नेणारी सर्व वाहने पूर्णपणे वरच्या बाजूने व सर्व बाजूनी पूर्ण झाकलेली असावीत. वाहनातून कोणत्याही प्रकारे गळती होऊ नये तसेच ओव्हरलोड होऊ नये, ह्याची दक्षता घेतल्याचे दिसून येत नाही., ६) बांधकामाच्या ठिकाणी सी.सी.टी.व्ही कॅमेरे बसविण्यात आल्याचे दिसून येत नाही.

७) बांधकामाच्या ठिकाणी सेन्सर आधारित वायू प्रदूषण मॉनिटर्स लावणे बंधनकारक असेल, प्रदूषणाची पातळी ओलांडणार नाही याबाबत उपाययोजना करण्यात आल्याचे दिसून येत नाही.,८) बांधकामाच्या ठिकाणी ग्राइंडिंग, कटिंग, ड्रोलिंग, सोईग आणि ट्रिमिंग ची कामे बंदिस्त भागात करावी व हवेचे प्रदूषण कमी करण्यासाठी पाण्याचे स्प्रिंकलर वापरून सतत फॉगिंग करण्यात आल्याचे दिसून येत नाही.

# ‘सीकेटी’च्या वेदिका महाबरेचा दिल्लीत प्रजासत्ताकदिनी संचलनामध्ये सहभाग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची एनसीसी कॅडेट गोल्डन सीनियर अंडर ऑफिसर वेदिका प्रमोद महाबरे यांची दिल्ली येथे नुकत्याच झालेल्या प्रजासत्ताक दिन संचलनासाठी निवड झाली होती.

वेदिका महाबरे हि एसवायबीएच्या विद्यार्थिनी असून, त्यांनी अत्यंत कठोर व सातत्यपूर्ण प्रशिक्षणातून यशस्वी वाटचाल केली आहे. त्यांनी सलग चार वार्षिक प्रशिक्षण शिबिरे पूर्ण केली असून दोन प्री-इंटर ग्रुप कॅम्पसाठी निवड होऊन पूर्ण निष्ठा, शिस्त आणि समर्पणाने उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे.

याच उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर त्यांची इंटर ग्रुप सिलेक्शन कॅम्पसाठी निवड झाली, जो राज्यस्तरीय स्तरावरील मानाचा कॅम्प आहे. पुढे त्यांची रिपब्लिक डे परेड कॅम्प २०२६साठी निवड झाली असून, त्यांनी राजपथ, नवी दिल्ली येथे होणाऱ्या



प्रजासत्ताक दिन संचलनात प्लाटून कमांडर म्हणून गौरवास्पद सहभाग नोंदविला होता. हे राज्यासाठी, बटालियनसाठी तसेच चांगू काना ठाकूर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या एनसीसी युनिट व पनवेल परिसरासाठी अत्यंत अभिमानास्पद व गौरवास्पद बाब आहे. गोल्डन सीनियर अंडर ऑफिसर वेदिका महाबरे यांच्या या यशामागे त्यांच्या माता-पिता, महाविद्यालयाचे प्राचार्य, असोसिएट एनसीसी ऑफिसर, केअर टेकिंग ऑफिसर तसेच सर्व शिक्षकवर्गाचे मोलाचे मार्गदर्शन व सातत्यपूर्ण प्रोत्साहन लाभले आहे. ३ महाराष्ट्र बटालियन एनसीसी, मुंबई ‘A’ ग्रुप अंतर्गत वेदिका महाबरे यांनी उत्कृष्ट शिस्त, प्रभावी नेतृत्वगुण, उत्तम शारीरिक तंदुरुस्ती व राष्ट्रीय सेवेच्या भावनेच्या जोरावर ही मानाची निवड मिळवली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे महाविद्यालयासह संपूर्ण परिसरात आनंद व अभिमानाची भावना निर्माण झाली आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. एस. के. पाटील, एएनओ प्रा. निलीमा तिदार, सीटीओ प्रा. सागर एस. व्यवहारे तसेच आयक्यूएसी समन्वयक प्रा. बी.डी. आघाव यांनी वेदिका यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. दिल्लीतील प्रजासत्ताक दिन संचलनात सहभागी होण्याची संधी मिळणे हे प्रत्येक एनसीसी कॅडेटसाठी अत्यंत गौरवाची बाब मानली जाते. वेदिका महाबरे यांच्या या यशामुळे महाविद्यालय व महाराष्ट्र एनसीसी युनिटचा मान अधिक उंचावला आहे.

# विद्यार्थ्यांसाठी मृदा विश्लेषण जनजागृती उपक्रम

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शनिवारी (दि.३१) रसायनशास्त्र विभाग व अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने मृदा विश्लेषण कार्यक्रमासाठी एक मार्गदर्शन व अभिमुखता कार्यक्रम आयोजित केला होता.



या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये मातीच्या आरोग्याविषयी, पोषक तत्त्वांच्या स्थितीविषयी तसेच त्यांचा पीक उत्पादन व शाश्वत शेतीवर होणाऱ्या परिणामांविषयी सखोल जागरूकता निर्माण करणे हा होता. या कार्यक्रमामध्ये माती परीक्षणाचे महत्त्व स्पष्ट करण्यात आले तसेच मातीचा पीएच मूल्य, विद्युत चालकता, सेंद्रिय कर्बाचे प्रमाण, तसेच मुख्य अन्नद्रव्ये यांची मूलभूत माहिती विद्यार्थ्यांना सविस्तरपणे देण्यात आली. माती परीक्षणाच्या आधारे योग्य खत व्यवस्थापन कसे करावे, जमिनीची सुपीकता कशी टिकवून ठेवावी आणि दीर्घकालीन शेती उत्पादन कसे वाढवावे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या अभिमुखता कार्यक्रमामध्ये एकूण १३ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला तसेच विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष समस्यांबाबत जाणून घेण्याची संधी मिळाल्यामुळे कार्यक्रम अधिक उपयुक्त ठरला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होण्यास मदत झाली तसेच समाजाभिमुख कार्याची जाणीव निर्माण झाली. या कार्यक्रमाच्या शेवटी मृदा आरोग्य जपण्यासाठी माती परीक्षणाचे नियमित महत्त्व, संतुलित खतांचा वापर आणि शाश्वत शेती पद्धती अंगीकारण्याचा संदेश देण्यात आला. रसायनशास्त्र विभाग व आयक्यूएसी यांच्या या उपक्रमामुळे शैक्षणिक ज्ञान आणि शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष गरजा यांमध्ये एक प्रभावी दुवा निर्माण झाला, अशी प्रतिक्रिया उपस्थितांनी व्यक्त केली.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी या उपक्रमाचे यशस्वीरित्या आयोजन केल्याबद्दल अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष व रसायनशास्त्र विभागातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांचे अभिनंदन केले व पुढील उपक्रमासाठी शुभेच्छा दिल्या. उपक्रमाचे आयोजन प्रा. डॉ. नीलम लोहकरे रसायनशास्त्र विभाग प्रमुख यांनी केले तसेच विभागातील इतर सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी यांनी सहकार्य केले.

# मृत्यूच्या दाढेतून प्रवाशाला काढले सुखरूप बाहेर

**पनवेल : वार्ताहर**

रेल्वे स्थानकावर एका प्रवाशासाठी रेल्वे कर्मचारी ’देवदूत’ ठरले. चालत्या गाडीत चढण्याच्या प्रयत्नात तोल जाऊन प्लॅटफॉर्म आणि गाडीच्या फटीत पडलेल्या प्रवाशाला रेल्वे कर्मचाऱ्यांनी अत्यंत धाडसाने आणि तत्परतेने मृत्यूच्या दाढेतून सुखरूप बाहेर काढून त्याचे प्राण वाचवले आहेत.

या थरारक घटनेमुळे स्थानकावर काही काळ प्रवाशांच्या हृदयाचे ठोके चुकण्याची वेळ आली होती; परंतु येथील रेल्वे कर्मचाऱ्यांनी दाखवलेल्या प्रसंगावधानामुळे या प्रवाशाचे प्राण वाचताच प्रवाशांनी या कर्मचाऱ्यांचे कौतुक केले आहे.

दादर-तिरुनेलवेली एक्स्प्रेस पनवेल स्थानकावर थांबली होती. गाडी सुटत असताना एका प्रवाशाने घाईघाईने जनरल डब्यात चढण्याचा प्रयत्न केला, मात्र अचानक पाय घसरल्याने त्याचा तोल गेला आणि तो थेट प्लॅटफॉर्म व धावत्या रेल्वेमधील अरुंद फटीत अडकला. हा प्रकार पाहताच आसपासच्या प्रवाशांनी मोठ्याने ओरडण्यास सुरुवात केली. हा आवाज ऐकून कोकण रेल्वेचे फिरते तिकीट निरीक्षक महेश कांबळे यांनी क्षणाचाही विलंब न लावता ऑन ड्युटी गार्डना गाडी थांबवण्याचा इशारा दिला. त्यानंतर गार्ड यांच्यासह महेश कांबळे आणि घेतली.

जीवाची बाजी लावून त्यांनी अजित परब यांनी घटनास्थळी धाव फटीत अडकलेल्या प्रवाशाला सुरक्षितपणे बाहेर काढले. सुदैवाने या घटनेत या प्रवाशाला गंभीर नाही. दरम्यान, रेल्वे सुरक्षा दलाच्या और दुखापत झाली जवानांनी तातडीने मदतीचा हात देत या प्रवाशाला प्लॅटफॉर्मवर आणल्यानंतर त्याच्यावर प्राथमिक उपचार करण्यात आले. त्यानंतर त्यांना पुढील तपासणीसाठी तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

प्रवाशांनी धावत्या गाडीत चढण्याचा किंवा उतरण्याचा प्रयत्न करू नये. आपले आयुष्य मौल्यवान आहे, त्यामुळे रेल्वे प्रवेश करावा, असे आवाहन पूर्ण चांबल्यानंतरच डब्यात कोकण रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी सुनील बी. नारकर यांनी केले आहे.

# पनवेल शहर पोलिसांच्या तत्परतेमुळे टळले अपघात

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर पोलिसांच्या तत्परतेमुळ शनिवारी (दि. ३१) सकाळी वाहनांना होणारे अपघात टळल्याची घटना पनवेलजवळील गव्हाण फाटा येथे घडली आहे.

पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गव्हाण फाटा येथील वपोनि नितीन ठाकरे, गोपनीय विभागाचे मनोज पाटील, पोल्स हवालदार माधव शेवाळे,



चालक समाधान पाटील, हे कर्तव्यावर असताना एका मच्छी वाहून नेणाऱ्या टेम्पो मधून मोठ्या प्रमाणात थर्माकोलचे बॉक्स हे भर रस्त्यात पडले या वेळी मोठ्या प्रमाणात वाहतुकीची वर्दळ सुरू होती.

हा प्रकार वपोनि नितीन ठाकरे यांच्या लक्षात येताच त्यांनी तातडीने त्यांच्या सोबत असलेल्या पथकाच्या साहाय्याने महामार्गावर धाव घेऊन रस्त्यावर पडलेले थर्माकोलचे मोठे बॉक्स त्वरित बाजूला केले. त्यामुळे होणारे अपघात टळले आहे. पोलिसांच्या तत्परतेबद्दल त्यांचे कौतुक होत आहे.

# एमएनएम विद्यालयात वक्तृत्व बालकविता, माहितीपट स्पर्धा




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या एमएनएम विद्यालयात संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी पदार्पण वर्षानिमित्त चित्राच्या माध्यमातून वास्तव मांडणारी, ज्ञान संशोधन आणि सर्जनशीलतेचा संगम असणारी आंतर शालेय माहितीपट, बालकविता सादरीकरण व वक्तृत्वस्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

स्पर्धेमध्ये संस्थेच्या संलग्न शाळेतील पूर्वप्राथमिक, प्राथमिक, व माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. सदरहू स्पर्धेचे बक्षीस वितरण शाळा समिती सदस्य रघुनाथ देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. शाळेच्या मुख्याध्यापिका सायली वडवलकर यांनी उपस्थित पाहुण्यांचे स्वागत केले. स्पर्धेतील विद्यार्थ्यांना संबोधित करताना या स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांच्या अंगीभुत कला गुण, अभिव्यक्ती, सादरीकरण यांना प्रोत्साहन मिळत असून विद्यार्थ्यांनी माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्यावरील माहितीपट, करणाऱ्या तसेच रामशेठ ठाकूरसाहेब त्यांच्या कार्यकर्तृत्व, सामाजिक राजकीय, जीवनपट असा उलगडा करणारे वक्तृत्व, स्पर्धेतील विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

स्पर्धेचे परीक्षण राहुल म्हात्रे, रतिका ठाकूर, रत्नमाला पाटील यांनी केले. राहुल म्हात्रे यांनी विद्यार्थ्यांच्या नावीन्यपूर्ण, सर्जनशील सादरीकरण बद्दल विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कांचन माने, वंदना जाधव यांनी केले. सांस्कृतिक विभाग प्रमुख शर्मिन काझी, वंदना जाधव यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

# स्वीप कार्यक्रमांतर्गत उरण तालुक्यात मतदान जनजागृती मोटरसायकल रॅली

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार, वार्ताहर**

स्विप कार्यक्रमांतर्गत उरण तालुका निवडणूक अधिकारी आविशकुमार सोनोने व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार उद्धव कदम व स्वीप पथक प्रमख निर्मला घरत तथा गटशिक्षणाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या १६ तारखेपासून उरण तालुक्यातील विविध गावांमध्ये जाऊन मतदान जनजागृती सुरू आहे.

शनिवारी नवीनशेवा येथून उरण तालुक्यातील सर्व शिक्षकांची मतदान जनजागृती मोटारसायकल रॅली निघाली.नवीन शेवे ते दिघोडे पर्यंत ही जनजागृती मोटरसायकल रॅली काढण्यात आली. या मोटारसायकल रॅलीचा शुभारंभ निवडणूक निर्णय अधिकारी आविश कुमार सोनोने,तहसीलदार डॉक्टर उद्धव कदम व निर्मला घरत, केंद्र प्रमुख यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

स्वीप कार्यक्रमातील सर्व शिक्षक वर्ग व तालुक्यातील सर्व शिक्षक बंधू भगिनी यांना ’मी मतदान करणारच’ नावाची टी-शर्ट देऊन हातामध्ये विविध मतदान जनजागृती बॅनर देऊन मोटारसायकल रॅली काढण्यात आली. या वेळी मतदान जनजागृतीच्या वेगवेगळ्या मतदार राजा जागा हो लोकशाहीचा धागा हो, मी मतदान करणारच, चला मतदान केंद्रावर जाऊ या मतदानाचा हक्क बजाऊ या. अशा घोषणा देण्यात आल्या.नवीन शेवे येथून निघालेली मोटारसायकल रॅली बोकडवीरा जेएनपीए वसाहत दास्तान फाटा जासई मार्गे दिघोडे येथे समाप्त करण्यात आली.



# पर्यावरण व मानव-वन्यजीव संघर्ष विषयावर जनजागृती

**उरण : बातमीदार**

पोसरी ठाकूरवाडी येथील रायगड जिल्हा प्राथमिक शाळा, पोसरी, रसायनी, तालुका पनवेल येथे पिल्लई कॉलेज,रसायनी राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागाच्या विशेष श्रम संस्कार शिबिरात फ्रेंड्स ऑफ नेचर (फॉन) सर्पमित्र निसर्गसंवर्धन संस्था, चिरनेर-उरण, रायगड (महाराष्ट्र)तर्फे शून्य सर्पदंश मृत्यू अभियान व संस्थेच्या स्नेक बाईट ॲक्शन टीम (एसएटी) या विषयावर संस्थेचे सदस्य तुषार अनंता कांबळे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना सर्प ओळख, सर्पदंश कसे टाळावे व सर्पदंश झाल्यास काय करावे? संस्थेच्या शून्य सर्पदंश मृत्यू अभियान आणि स्नेक बाईट ॲक्शन टीम प्रकल्पाबद्दल तसेच पर्यावरण व मानव-वन्यजीव संघर्ष या विषयांवर जनजागृती केली.



उपस्थित विद्यार्थ्यांना रात्री ०८ ते १० वाजेपर्यंत २ तास मार्गदर्शन केले. मेकॅनिकल आणि सिव्हिल इंजिनियरिंग या दोन्ही विभागाची एकूण ५० मुली -मुले या कार्यक्रमासाठी उपस्थिती होती.भविष्यात अश्या कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांना एखादा वन्यजीव (साप) वाचविण्यास तसेच कोणास चुकून सर्पदंश झाल्यास तो साप विषारी अथवा बिनविषारी हे ओळखण्यास मदत होईल. कार्यक्रमासाठी पिल्लई कॉलेज रसायनी चे प्राध्यापक विक्रम पवार, वैभव भगत, अपूर्वा देशपांडे,सायली कुलकर्णी इ.शिक्षक तसेच फॉन संस्थेतर्फे अलका अनंता कांबळे व स्नेहा तुषार कांबळे यांची कार्यक्रमासाठी विशेष उपस्थिती व सहकार्य लाभले.









आपल्या चित्रपटसृष्टीला आता जराही उसंत अशी नको झालीय... 'बॉर्डर २' आज देश विदेशात लोकप्रिय ठरलाय तोच 'बॉर्डर ३' पडद्यावर आणणार आहोत याची जे.पी. फिल्मची निधी दत्ता आणि टी सिरीजचे भूषणकुमार यांनी घोषणा केली आहे. हा चित्रपट ११ सप्टेंबर २०२६ रोजी प्रदर्शित होत आहे...

'बॉर्डर २'मध्येही १९७१ सालचे पाकिस्तानवर विजय मिळवला त्याचं

# 'बॉर्डर २' लोकप्रिय होतोय तोच 'बॉर्डर ३'ची तयारी






झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

जमिनीवरील युद्ध, हवेतील युद्ध आणि समुद्रातील युद्ध आपल्याला रोमांचक पद्धतीने पहायला मिळते. त्या युद्धावर जाताना त्या तीनही दलाच्या जवानांना त्यांची आई वेगळ्या पद्धतीने आशीर्वाद देते ही गोष्ट खास उल्लेखनीय,

एक आई म्हणते : बेटा युद्ध के लिए जा रहा है. यावर मुलगा म्हणतो, मुझे आशीर्वाद दो की दुश्मनों को मार करके ही वापस आऊं. मां कहती है – बेटा तुम्हारे दुश्मनों की भी तो कोई मां होगी. वे भी अपनी मां से लम्बी उमर का आशीर्वाद लेकर आये होंगे.

दुसरी आई म्हणते : मैं कभी नहीं चाहती थी कि मेरा बेटा भी तुम्हारी तरह फौज में जाए, लेकिन जिस दिन मैंने उसे फौज की वर्दी पहने शपथ लेते हुए देखा –मुझे उस पर बड़ा फ़ख्र हुआ.

तिसरी आई म्हणते, जाओ, दोनों जंग जीतकर आओ. एक यह जंग और दूसरी जो तुम्हारे भीतर चल रही है.

चित्रपटाच्या उत्तरार्धात आपल्याला अतिशय थरारक असे युद्ध पहायला मिळते. त्यासाठी व्हीएफएक्स आणि एआय तंत्रज्ञानाचा भरपूर वापर केला असून त्याचा विलक्षण प्रभाव पडद्यावर दिसतो.

जहाँ से भी घुसोगे सामने हिन्दुस्थानी फौजी खडा पाओगे... जे.पी. दत्ता निर्मित आणि अनुराग सिंह दिग्दर्शित 'बॉर्डर २'च्या टीझरला अतिशय वेगाने लाईक्स वाढल्या आणि तेव्हाच या चित्रपटाचं व्यावसायिक यश स्पष्ट झाले. आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढीला नवीन चित्रपटांचे पोस्टर, टीझर आणि ट्रेलर जास्त महत्त्वाचे. 'धुरंदर'पाठोपाठ 'बॉर्डर २'ने तेच अधोरेखित केले.

या युद्धपटात सनी देओल, वरुण धवन, आयुष्यमान खुराणा, अहान शेट्टी, दिलजीत दोसाझ इत्यादींच्या प्रमुख भूमिका आहेत. जे.पी. दत्ता दिग्दर्शित बॉर्डर (१९९७) या चित्रपटाचा दुसरा भाग बॉर्डर २ आणि आता तिसरा भाग बॉर्डर ३ची तयारी...

आपल्या हिंदी चित्रपटसृष्टीत युद्धपटाची यशस्वी परंपरा आहे. एक विशेष उल्लेखनीय युद्धपट सांगायचा, तर अब तुम्हारे हवाले वतन साथियो... चित्रपटाच्या क्लायमॅक्सला हे गाणे पडद्यावर येते आणि चित्रपटगृहातील प्रेक्षक भावनाविवश होत असतानाच त्यांच्यातील देशभक्तीची भावना विलक्षण जागी होते. चित्रपटाचा योग्य असा परिणाम झालेला दिसत असतो. ते कमालीचे स्तब्ध झालेले असतात. येथे दिग्दर्शक दिसतो असेही म्हणता येईल.

चेतन आनंद दिग्दर्शित 'हकिकत' (मुंबईत रिलीज २० एप्रिल १९६४. मेन थिएटर रॉक्सी)च्या विलक्षण प्रभावाने प्रेक्षक अंतर्मुख झाले. हिंदी चित्रपटसृष्टीतील हा पहिला युद्धपट. हा एक क्लासिक चित्रपट म्हणून ओळखला जातो. १९६२ साली भारत आणि चीन यांच्यातील युद्धावर आधारित हा चित्रपट आहे. आपण यावर चित्रपट निर्माण करावा असे चेतन आनंदना वाटले, पण युद्धासारख्या वास्तव घटनांवर आधारित चित्रपट निर्माण करायचा तर शासनाची परवानगी हवी आणि युद्धपट निर्माण करायचा तर तसे बजेट हवे. सुदैवाने चेतन आनंदना दोन्हीत प्रयत्नपूर्वक का होईना पण यश प्राप्त झाले. तेव्हाच्या पंजाब सरकारकडून आर्थिक मदत झाली, तर केंद्र शासनाकडून लडाख येथे चित्रीकरणाला परवानगी मिळाली.

या चित्रपटासाठी विजय आनंद कास्टिंग दिग्दर्शक होता. चेतन आनंद व विजय आनंदने 'हकिकत'चे कलाकार निश्चित केले. बलराज साहनी, जयंत असे अनुभवी, धर्मेंद्रसारखा तोपर्यंत चित्रपटसृष्टीत हळूहळू जम बसवत असलेला कलाकार, खुद्द विजय आनंद याबरोबरच नवखा संजय खान, सुधीर, इंद्राणी मुखर्जी यांच्यासह प्रिया राजवंश. तेव्हा ती इंग्लंडची रहिवाशी होती, तिकडे Royal Academy of Dramatic art यात कार्यरत होती, अभिनयाची आवड होती आणि आपणास हिंदी चित्रपटात काम करायचयं असे तिने चेतन आनंद वगैरेना पत्र लिहिले होते. चेतन आनंदनी तिला प्रतिसाद दिला आणि ती मुंबईत आली.

शूटिंगची तयारी, कलाकारांची निवड हे होत असतानाच कैफी आझमी यांच्या गीतांना मदन मोहनचे संगीत, गाण्याचे रेकॉर्डिंग हे सगळे झाले. मदन मोहनने दिल्लीत एका हॉटेलमध्ये भूपिंदर सिंगला गिटार वाजवताना पाहिले. त्याला मुंबईत मोहम्मद रफीसोबत हो के मजबूर हमे हे गाणे गायला बोलावले, पण चारच ओळींची संधी मिळाल्याने तो नाखूष होता. चित्रपटातही त्याला छोटीशी भूमिका मिळाली.

इंडियन पीपल्स थिएटर असोसिएशनच्या कलाकारांना या चित्रपटात मानधनाशिवाय काम करायचे ठरवले. अब तुम्हारे.... गाणे चित्रपटाच्या अगदी शेवटी असावे, अतिशय चांगला परिणाम साध्य होईल असे कैफी आझमीचे म्हणणे होते. चेतन आनंदना ते मान्य नव्हते. हा निर्णय साहसी वाटत होता. तोपर्यंत हिंदी चित्रपट फारशी चौकट मोडत नव्हता. पण हा निर्णय योग्य ठरला. या चित्रपटाला या गाण्याने अधिकच उंचीवर नेले आणि तेव्हापासून हे राष्ट्रभक्तीने प्रेरीत गाणे म्हणून ओळखले जाते. प्रत्येक राष्ट्रीय सणाला लाऊडस्पीकरवर हे गाणे हमखास लावले जाऊ लागले. अशा भारावलेपणाने चित्रपटगृहातून बाहेर पडलेल्या रसिकांनी या चित्रपटाचे विलक्षण कौतुक केले. माऊथ पब्लिसिटीवर हा चित्रपट अधिकाधिक प्रेक्षकांपर्यंत पोहचत राहिला यात आश्चर्य नाही. इतकेच नव्हे तर या चित्रपटावर त्यानंतर वारंवार मुद्रित माध्यमातून लिहिले गेले, याची गाणी रेडिओवर ऐकायला मिळत राहिली त्यामुळे हा चित्रपट पुढील पिढीतही जात राहिला. मी स्वतः सत्तरच्या दशकात मॅटीनी शोला, गल्ली चित्रपटात पुन्हा पुन्हा पाहिला. या चित्रपटाचे मेकिंगच भारावून टाकणारे आहे. हा चित्रपट कृष्ण धवल अर्थात ब्लॅक अँड व्हाईट स्वरुपात असून या चित्रपटात तो रंग काही वेगळाच अनुभव देणारा ठरतो. हा एक उत्तम आदर्श युद्धपट म्हणून गणला जातो.

या चित्रपटात बलराज साहनी (मेजर रणजित सिंग), धर्मेंद्र (कॅप्टन बहादूर सिंग), विजय आनंद (मेजर प्रताप सिंग) तसेच प्रिया राजवंश, संजय खान, सुधीर, शेख मुख्तार इत्यादींच्या प्रमुख भूमिका आहेत. या चित्रपटातील जरा सी आहट होती है (पार्श्वगायिका लता मंगेशकर), अब तुम्हारे हवाले वतन साथियो (मोहम्मद रफी), हो के मजबूर मुझे ( मोहम्मद रफी, भूपेन्द्र सिंग), मै यह सोचकर (मोहम्मद रफी), आई अबके साल दीवाली (लता मंगेशकर) ही या चित्रपटातील गाणी आजही तेवढीच लोकप्रिय आहेत. अनेक यशस्वी चित्रपट गाण्यांच्या लोकप्रियतेने सतत पुढील पिढीला माहिती होत राहिले. १९६५ साली या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा दुसऱ्या क्रमांकाचा राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाला. तर २०१२ साली आधुनिक तांत्रिक सोपस्काराने हा चित्रपट रंगीत करण्यात आला तरी मूळ ब्लॅक अँड व्हाईट काळातील चित्रपट ही त्याची ओळख जास्त प्रभावी आणि पहिला युद्धपट हा ठसा जास्त उल्लेखनीय.

चेतन आनंद यांनी दशकभरानंतर 'हिन्दुस्थान की कसम' (१९७३) हा १९७१च्या भारत व पाकिस्तान यांच्यातील युध्दावर आधारित युध्दाच्या अधिकाधिक साहसी दृश्यांचा युध्दपट दिग्दर्शित केला, पण तो 'हकिकत'चा दर्जा साध्य करु शकला नाही... हकिकत म्हणताक्षणीच या युध्दपटातील अनेक प्रसंग डोळ्यासमोर येतात, काही भावस्पर्षी दृश्यही आठवतात आणि त्यातील गाणी ओठांवर येतात तर मग आणखी काय हवे.

आपल्या देशात हॉलीवूडच्या दर्जाचे अस्सल थरारक युध्दपट निर्माण होत नाहीत, असे म्हणणारा एक वर्ग आपल्या देशात आहे.

आदित्य धर दिग्दर्शित 'उरी द सर्जिकल स्ट्राईक' (२०१८) हा आजच्या मल्टीप्लेक्स युगातील लक्षवेधक आणि प्रभावी असा युध्दपट आहे.

१९७१ साली बांगलादेश निर्माण झाला तेव्हाच्या भारताने युध्दात पाकिस्तानवर मात करत देदीप्यमान विजय प्राप्त केला तेव्हा संपूर्ण देशभरात एक वेगळेच सकारात्मक वातावरण निर्माण झाले होते आणि तेव्हा मोठ्याच प्रमाणावर देशभक्तीवरचे चित्रपट निर्माण झाले. काही विशेष उल्लेखनीय चित्रपट सांगायचे तर रामानंद सागर निर्मित व दिग्दर्शित 'ललकार' (१९७२), चेतन आनंद दिग्दर्शित 'हिन्दुस्तान की कसम' (१९७३), जे. ओम प्रकाश निर्मित 'आक्रमण' (१९७५)मध्ये सैनिक आणि युध्द यांच्या पार्श्वभूमीवरील प्रेमाचा त्रिकोण होता. संजीवकुमार, रेखा व राकेश रोशन हे कलाकार होते.

अभिनेता, लेखक, निर्माता व दिग्दर्शक जोगिंदर याने सैनिकाच्या आयुष्यावर आधारित 'फौजी' हा चित्रपट निर्मित व दिग्दर्शित केला. सुनील दत्त दिग्दर्शित 'डाकू और जवान' हा चित्रपट याच काळात निर्माण झाला. त्या काळात अनेक चित्रपटात लहान मोठ्या संदर्भात या युध्दाचा प्रभाव दिसे. आय.एस. जोहरने चक्क 'जोय बांगलादेश' या नावाचा चित्रपट निर्माण केला. या चित्रपटाची त्याने मोठ्याच प्रमाणावर पब्लिसिटी केली, पण सेन्सॉरने या नावालाच हरकत घेतली त्यामुळे या चित्रपटाचे नाव बदलून 'आगे बढो' असे करण्यात आले. याशिवाय 'मेरा देश मेरा धरम' वगैरे चित्रपट त्या काळात पडद्यावर आले.

याच युध्दाच्या पार्श्वभूमीवरचा जे. पी. दत्ता दिग्दर्शित 'बॉर्डर' (१९९७)ला पिरियड चित्रपट असेही म्हणता येईल. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील १९७१ साली झालेल्या युद्धावर आधारित चित्रपट. या युद्धातील लोंगोवाल करार, भारतीय सैन्याचा विजय, जवानांना येत असलेली घरची आठवण, पत्रातून मनमोकळेपणाने भावना व्यक्त करण्याचं माध्यम, युद्धभुमीवरचे वातावरण याभोवती हा चित्रपट आहे. जे.पी. दत्ताने एकूणच या संदर्भात भरपूर माहिती मिळवली. त्या युध्दाशी संबंधित हयात असलेल्यांच्या भेटीगाठी घेतल्या. ही एक मोठी प्रक्रिया असते. प्रत्यक्ष घटनेवर आधारित चित्रपट असल्याने तर अधिकाधिक योग्य ती माहिती, तपशील, संदर्भ मिळवणे आवश्यक होते. १९९५च्या सप्टेंबरमध्ये पटकथेवर काम सुरु केले आणि ते १९९६च्या एप्रिल महिन्यापर्यंत म्हणजे सात महिने चालले. हे सगळे होत असताना चित्रपटासाठी तंत्रज्ञ आणि कलाकारांची निवड याची प्रक्रिया सुरु होते. महत्त्वाचे होते ते कला दिग्दर्शन आणि छायाचित्रणकार. या चित्रपटाचे बरेचसे चित्रीकरण राजस्थानातील बिकानेर आणि जोधपूर येथे करायचे होते. कला दिग्दर्शन रत्नाकर फडके यांचे तर छायाचित्रण ईश्वर बिरदी आणि निर्मल जानी यांचे आहे. हे सगळे होत असताना भारतीय लष्कर आणि हवाई दल यांच्याकडून बरीच मदत झाली. थीमनुसार अनेक तपशील, गोष्टी, संदर्भ तर मिळालेच, पण युद्धातील वाहने, रायफल, मशीनगन, गणवेश यांची बरीच माहिती मिळाली. १९७१च्या युद्धावर आता पंचवीस वर्षानंतर चित्रपट आकार घेत होता. त्याबरोबरच तेव्हाच्या युध्दातील सामुग्रीची माहिती महत्वाची होती. भारतीय लष्कराने पाकिस्तानी टाईप ५९ सारख्या टी ५५ टाक्या, ब्रेन मशीनगन, एसएलआर सारखी शस्त्रे, हॉकर हॅटर्स, मिग २१ याची माहिती दिली आणि मग त्यानुसार बरीच तयारी करावी लागली. इतका मोठा युध्दपट सहजी आकाराला येत नाही हेच खरे. अनेक संदर्भ, पटकथा, विविध स्तरांवरील परवानगी, उच्च दर्जाचे छायाचित्रण, तंत्रज्ञान असं करत करत युद्धपट आकार घेत जातो.

चित्रपट प्रदर्शनास सज्ज झाला असताना सर्वप्रथम गाजले ते जावेद अख्तर लिखित आणि अन्नू मलिकने स्वरबद्ध केलेल्या 'संदेसे आते है, हमे ले जाते है' हे गाणे. आजही हे गाणे लोकप्रिय आहे. युद्ध सीमेवरील जवान आणि त्यांचे दूरवर राहत असलेले कुटुंबिय यांच्यातील संपर्काचे महत्त्वाचे माध्यम म्हणजे पत्र. हे एकमेकांची ख्याली खुशाली विचारणारे आणि कळवणारे पत्र म्हणजे कमालीची भावनिक ओढ. उत्कट नाते. मनमोकळ्या होत असलेल्या भावना. 'बॉर्डर २'मध्येही या गाण्याचा तशाच उत्कटतेने पटकथेत समावेश करण्यात आला आहे.

'बॉर्डर'ची पूर्णतेची आणि कॅसेट रिलीजची जुहूच्या एका पंचतारांकित हॉटेलमधील जंगी पार्टी मला आजही आठवतेय. एक अतिशय भव्य युध्दपट येतो आहे हे या वेळी याची गाणी पाहताना (त्या काळात नवीन चित्रपटाची अशी गाणी दाखवण्याची प्रथा होती.) जाणवले.

या चित्रपटात सनी देओल (मेजर कुलदीपसिंह चांदपुरी), जॅकी श्रॉफ (विग कमांडर एंडी बजवा), सुनील शेट्टी (कॅप्टन शेखावत), अक्षय खन्ना (सेकंड लेफलन्ट धरमवीर) यांच्यासह राखी गुलजार, तब्बू, पूजा भट्ट, कुलभूषण खरबंदा, सुदेश बेरी, पुनीत इस्सार, राजीव गोस्वामी, अमृत पाल इत्यादींच्याही प्रमुख भूमिका आहेत. या चित्रपटाला वीस वर्षे पूर्ण झाली तेव्हा एका विशेष सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. मी तेव्हा त्या सोहळ्याचा अनुभव घेतला असता चित्रपटाशी संबंधित सगळेच जुन्या आठवणीत रमल्याचे आणि थोडेसे भावूकही झाल्याचे जाणवले. एखाद्या कलाकृतीशी असे जोडलेले असणे या ग्लॅमरस क्षेत्रातील एक प्रकारचे माणूसपण आहे.

'बॉर्डर'नंतरच्या दिग्दर्शक जे.पी. दत्ताच्या चित्रपटातील 'एलओसी कारगील' (२००३) आणि 'पलटण' (२०१८) या युध्दपटांवर प्रचंड मेहनत घेतली, खूप खर्च केला, पण त्यांना 'बॉर्डर'ची उंची गाठता आली नाही... युद्धपटाची दखल घेताना ही नावे आवर्जून घ्यायला हवीत, गुंजन द कारगील, लक्ष्य, शेरशाह, भुज द प्राईड ऑफ इंडिया, कॅप्टन इंडिया, सॅम बहादूर, मेजर टॅन्गो चार्ली, पिप्पा वगैरे वगैरे. आदित्य धर दिग्दर्शित 'उरी द सर्जिकल स्ट्राईक' (२०१९) हा अलिकडचा अतिशय प्रभावी आणि महत्त्वाचा युध्दपट आहे. पाकिस्तानने २०१७ साली सीमारेषेवर हल्ला करणे, भारतीय भूमित शिरणे अशा काढलेल्या कुरापतींना भारतीय जवानांनी अतिशय निडरपणे हे आव्हान परतवून लावले आणि सतत डावपेच बदलत जे यश संपादन केले हा सगळा थरार या चित्रपटात आहे. या चित्रपटात विकी कौशल प्रमुख भूमिकेत आहे. युद्धपटात थीमनुसार वातावरण निर्मिती खूपच महत्वाची असते. हे वातावरण एक प्रकारची व्यक्तिरेखाच असते.

'हकिकत' आणि 'बॉर्डर' हे हिंदीतील सर्वोत्कृष्ट युद्धपट आहेत. ते आठवले तरी देशभक्तीची भावना जागी होते आणि ते पाहताना स्फुरण चढते.

चेतन आनंद निर्मित व दिग्दर्शित 'हिन्दुस्तान की कसम'ची कैफी आझमीची गाणी व मदन मोहनचे संगीत हे तर अप्रतिम. हर तरफ अब यही अफसाने है (पार्श्वगायक मन्ना डे), है तेरे साथ मेरी वफा (लता मंगेशकर) ही क्लासिक गाणी अगदी आवर्जून वेळ काढून ऐकावी. चित्रपटात राजकुमार, प्रिया राजवंश इत्यादींच्या प्रमुख भूमिका. 'हिन्दुस्तान की कसम' म्हटलं की चेतन आनंदचा चित्रपट ही ओळख कायम.

'हिन्दुस्तान की कसम' वीरु देवगन यांनी दिग्दर्शित केला, पण पिक्चर फारसा रंगला नाही. अजय देवगनची दुहेरी भूमिका हे विशेष, पण गोष्टीत रंगतता नाही... अजय व जय मल्होत्रा (दोन्ही अजय देवगन) लहानपणी हरवतात. एक हिन्दुस्तानात सैन्यात भरती होतो, तर दुसरा पाकिस्तानात दहशतवादी. त्याचे नाव तौहिद असे ठेवले जाते. हे दोघे एकमेकांविरुध्द लढतात. त्या काळात पाकिस्तान कश्मीरमध्ये बऱ्याच कुरापती करीत असे आणि भारतीय सैन्य त्यांना अद्दल घडवे आणि काश्मीर सीमेवरचा वाढता दहशतवाद आणि त्याचा कणखरपणे होणारा पाडाव हे होत होते. मणि रत्नम दिग्दर्शित 'रोजा' असो वा अनिल शर्मा दिग्दर्शित 'एलान ए जंग' असो, अलिकडेच आलेला 'एक्कीस' असो, सीमेवरील दहशतवादाचा पाडाव वेगवेगळ्या प्रकारे रुपेरी पडद्यावर येत राहिला.

युद्धपट हे देशप्रेमाची भावना जागी करतात. देश रक्षणासाठी सीमेवर लढत असलेल्या सैनिकांच्या जीवन व संघर्ष, जिद्द व मेहनत यांचा प्रत्यय देतात. त्यांच्यामुळे आपण सुरक्षित आयुष्य जगतोय हे त्यातून अधोरेखित होत आहे. खरंतर जवळपास सर्वच युध्दपट हे सर्व राज्यात करमुक्त (आजच्या काळात जीएसटीमुक्त) करण्यात यावेत. त्यामुळे ते अधिकाधिक मेहनत पोहचतील. युद्धपट म्हणजे केवळ मनोरंजन नाही तर त्यासह ते चित्रपट प्रबोधनही करीत आहेत.

'बॉर्डर ३'च्या निमित्ताने असा फोकस हवाच. मल्टीप्लेक्सचा भव्य दिव्य दिमाखदार पडदा, उच्च दर्जाची साऊंड सिस्टीम आणि फोर डी स्क्रीन असेल तर व्हीएफएक्स आणि एआय तंत्रज्ञानाचा थरारक अनुभव हे युद्धपटाला अतिशय पूरक आहे. सोशल मीडियात 'बॉर्डर ३'चीही चर्चा सुरू झाली आहे. चित्रपटाचा प्रेक्षक जागरूक झाला आहे...

# महिला अंतराळवीर कल्पना चावला



भारतीय वंशाची अमेरिकन अंतराळवीर कल्पना चावला यांचा आज स्मृतिदिन. कोलंबिया या यानाला पृथ्वीवर परत येत असताना अपघात होऊन त्यात त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. त्यांच्यासोबत सहा अंतराळवीरांचा चमू होता. त्यांचादेखील या अपघातात दुर्दैवी अंत झाला. कल्पना या अंतराळात जाणाऱ्या भारतीय वंशाच्या पहिल्या महिला अंतराळवीर होत्या.

कल्पना चावला यांचा जन्म १७ मार्च १९६२ रोजी हरयाणातील कर्नाल येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव बनारसीलाल, तर आईचे नाव संयोगिता असे होते. त्यांच्या वडिलांचा औद्योगिक वस्तू निर्मितीचा व्यवसाय होता आणि आई गृहिणी होती. कल्पना चावला यांचे शालेय शिक्षण टागोर बाल निकेतन या विद्यालयात झाले.

अभ्यासात हुशार असणाऱ्या कल्पना चावला यांनी १९८२ साली पंजाब विद्यापीठातून एअरोनिटीकल अभियांत्रिकी पदवी मिळवली. त्यांनी १९८४ साली अमेरिकेच्या टेक्सास विद्यापीठातून एरोनिटीकल उच्च अभियांत्रिकी शिक्षण पूर्ण करून कोलोरॅडो विद्यापीठातून एरोस्पेस अभियांत्रिकी विभागातून १९८८ साली डॉक्टरेट पदवी प्राप्त केली. त्यांचे अंतराळवीर होण्याचे स्वप्न होते. ते पूर्ण करण्यासाठी त्या नासा या अमेरिकेतील अंतराळ संशोधन संस्थेत भरती झाल्या. १९८८ साली त्यांनी नासातील एम्स रिसर्च सेंटर ओव्हरसेट मेथडस्च्या उपाध्यक्ष म्हणून काम पाहिले. तिथे त्यांनी कॉम्प्युटेशनल फ्ल्यूईड डायनॅमिकमध्ये जागेवरच उभे उड्डाण आणि जमिनीवर उतरणे या विषयांवर संशोधन केले.

यानंतर चावला यांना ग्लायडर्स, सील्पेन्स तसेच एक किंवा अनेक इंजीन असलेली विमाने याच्या व्यावसायिक वैमानिकांना प्रशिक्षण देण्याचा परवाना मिळाला. १९९१ साली त्यांना अमेरिकेचे नागरिकत्व मिळाले. नागरिकत्व मिळाल्यावर त्यांनी १९९५ साली नासामध्ये अस्ट्रोनोट कॉर्प्स होण्यासाठी अर्ज केला. त्यांना त्यासाठी 'नासा'ने प्रवेशही दिला. त्यांची मार्च १९९६मध्ये पहिल्या उड्डाणासाठी निवड झाली. त्यांची पहिली अंतराळ मोहीम १९ नोव्हेंबर१९९७ रोजी सुरू झाली. त्यांनी अंतराळात १०.६७ दशलक्ष किमी प्रवास केला. हे अंतर २५२ वेळा पृथ्वीला प्रदक्षिणा घालण्याएवढे होते.

कल्पना चावला यांना २००० साली त्यांच्या दुसऱ्या उड्डाणासाठी एसटीएस १०७ साठीदेखील निवड झाली, परंतु ही मोहीम तांत्रिक अडचणींमुळे लांबली जात होती. त्या १६ जानेवारी २००३ रोजी एसटीएस १०७ मोहिमेसाठी जाण्यासाठी कोलंबिया अंतराळ मोहिमेवर आल्या.

या मोहिमेत कल्पना चावला यांना सूक्ष्म गुरुत्वाकर्षणात प्रयोग करणे ज्यामध्ये ते आणि त्यांच्या चमूला ८० प्रयोग करावयाचे होते त्यात पृथ्वी आणि अंतराळ विज्ञान, अद्ययावत तंत्रज्ञान निर्मिती, अंतराळवीरांचे आरोग्य आणि सुरक्षा या विषयांचा समावेश होता.

आपली मोहीम फत्ते करून १ फेब्रुवारी २००३ रोजी हे अंतराळ यान कोलंबियाच्या टेक्सास येथे पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश करताना आणि जमिनीवर उतरताना दुर्दैवी अपघात झाला. या दुर्दैवी अपघातात कल्पना चावला आणि त्यांच्या चमूचा दुर्दैवी अंत झाला. त्यांच्या मृत्यूनंतर जगभर हळहळ व्यक्त करण्यात आली. त्यांना मरणोत्तर काँग्रेशनल स्पेस सेवा पदक, नासा स्पेस फ्लाईट तसेच नासा विशेष सेवा पदकाने गौरविण्यात आले. जगभरातील विविध विद्यापीठांनी त्यांच्या नावे विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्त्या जाहीर केल्या. ५ फेब्रुवारी २००३ रोजी भारताच्या पंतप्रधानांनी हवामान विषयीच्या उपग्रहाला 'कल्पना १' हे नाव दिले. त्यानंतर सोडण्यात आलेल्या उपग्रहालाही 'कल्पना २' हे नाव देण्यात आले. हरियाणा सरकारने कल्पना चावला यांच्या नावाने ज्योतिसार, कुरुक्षेत्र येथे प्लेनेटेरिअम सुरू केले. नासाने सुपर कॉम्प्युटरला कल्पना चावला यांचे नाव दिले.

कल्पना चावला यांनी आपल्या धैर्य, चिकाटी, जिद्द आणि बलिदानाने देशाचे नाव उज्ज्वल केले. कल्पना चावला या आज आपल्यात नसल्या तरी त्यांच्या स्मृती आजही आपल्या मनात कायम आहेत. कल्पना चावला यांचे कार्य आजच्याच नाही तर येणाऱ्या पिढीसाठीही प्रेरणादायी आहे. पहिल्या महिला अंतराळवीर कल्पना चावला यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**(साभार : इंटरनेट)**

# रोहा येथे गुरे तस्करीप्रकरणी कारवाई

## तीन जनावरे आणि वाहनासह ५.८० लाखांचा मुद्देमाल जप्त

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यात गुरांची अवैध वाहतूक व चोरीच्या घटनांवर आळा घालण्यासाठी रायगड जिल्हा स्थानिक गुन्हे शाखा (एलसीबी) पथकाने मोठी कारवाई करत तीन जनावरे व पिकअप वाहन असा एकूण सुमारे पाच लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



दरम्यान, रायगड जिल्हा स्थानिक गुन्हे शाखेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून मेढा परिसरात गुरांची बेकायदेशीर वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर एलसीबीचे पोलीस शिपाई मोरेश्वर ओमले, चालेकर तसेच रोहा पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी टेमकर यांनी मेढा विभागात पेट्रोलिंगला सुरुवात केली. २९ जानेवारी २०२६ रोजी रात्री सुमारे ११.२५ वाजण्याच्या सुमारास पेट्रोलिंगदरम्यान पडम गावाच्या हद्दीत संशयास्पद पिकअप वाहन दिसून आले. पोलिसांनी तत्काळ वाहन अडवून तपासणी केली असता पिकअप (एमएच/०६/बीडब्ल्यू/४२५९)मध्ये निर्दयतेने कोंबलेली जनावरे आढळून आली.

तपासणीदरम्यान या पिकअपमध्ये एक काळ्या रंगाची गोळशिंगे असलेली अंदाजे वय आठ वर्षे, किंमत १ लाख ३५००० हजार व काळा रंगाची गोळ शिंगे वय वर्ष सात किंमत (१ लाख ३५००० हजार) दोन म्हशी व एक रेडकू काळ्या रंगाचे वय (आठ दिवस) किंमत (१००००), एक पांढऱ्या रंगाची महिंद्रा कंपनीची यलो नंबर प्लेट असलेली एमएच ०६ बीडब्ल्यू ४२५९ किंमत (३०००००) विनापरवाना वैध परवानगी, खरेदी–विक्रीची पावती अथवा पशुसंवर्धन विभागाची मंजुरी नसताना वाहतूक केली जात असल्याचे स्पष्ट झाले.

या वाहनाचा चालक प्रसाद गंगाराम कोकळे (वय २८, व्यवसाय – दूध व्यवसाय, रा. शिल्पनगरी, भुवनेश्वर रोड, रोहा) असा असून तो चोरीची जनावरे गोळा करून त्यांची अवैध विक्री करण्याच्या उद्देशाने वाहतूक करत असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. या कारवाईत पोलिसांनी दोन म्हशी, एक रेडकु तसेच महिंद्रा कंपनीचा पांढऱ्या रंगाचा पिकअप वाहन असा एकूण ५,८०,००० किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

# महामंडळाच्या थकबाकीदार लाभार्थींना कर्जमुक्तीबाबत आवाहन

**अलिबाग : प्रतिनिधी**

ओबीसी महामंडळाच्या थकीत कर्ज प्रकरणात संपूर्ण थकीत कर्ज रकमेचा एकरकमी भरणा करणाऱ्या लाभार्थीस थकीत व्याज रकमेत ५० टक्के सवलत देण्याबाबतची एकरकमी परतावा योजना राबविण्यात येत आहे. त्यानुसार महामंडळाच्या थकबाकीदार लाभार्थीने या योजनेचा लाभ घेऊन कर्जमुक्त व्हावे, असे आवाहन शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक गंगाधर डोईफोडे यांनी केले आहे.

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित आणि विकास महामंडळ मर्या. मुंबई यांचे जिल्हा कार्यालय रायगड यांच्यामार्फत विविध कर्ज योजनेंतर्गत रायगड जिल्ह्यातील इतर मागास प्रवर्गातील लाभार्थ्यांना स्वयंरोजगाराकरीता अल्प व्याजदराने कर्ज वितरीत करण्यात आले आहे. या लाभार्थींना कर्ज परत फेडीसाठी विहित मुदत देण्यात येते. विहित मुदत संपून गेली असताना देखील बऱ्याच लाभार्थींनी महामंडळाकडे शिल्लक रकमेची परतफेड अद्याप केलेली नाही. तसेच थकीत कर्जवसुलीसाठी सर्व वैधानिक प्रयत्न महामंडळाकडून करण्यात येत आहेत.

याकरीता महामंडळाच्या थकीत लाभार्थीसाठी संपूर्ण थकीत कर्ज रकमेचा एक रकमी भरणा करणाऱ्या लाभार्थीस थकीत व्याज रकमेत ५० टक्के सवलत देण्याची सुधारित एक रकमी परतावा योजना नव्याने राबविण्यात येत आहे. या योजनेचा लाभ घेऊन सर्व संबंधित लाभार्थींनी थकीत मुद्दल व व्याज रक्कम एकरकमी भरणाकरुन कर्ज खाते बंद करून कर्जमुक्त व्हावे व भविष्यात होणारी संभावित कायदेशीर कार्यवाही टाळावी.

# जंजिरा संस्थान मुक्ती संग्राम दिन उत्साहात

**मुरुड : प्रतिनिधी**

जंजिरा संस्थान मुक्ती संग्राम दिन ३१ जानेवारी रोजी साजरा करण्यात येतो. मुरुड तालुका पत्रकार संघ व रायगड प्रेस क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने जंजिरा मुक्ती संग्राम दिन मोठ्या उत्सहात साजरा करण्यात आला.



आझाद चौकात मुरूड नगर परिषदेच्या नगराध्यक्षा आराधना मंगेश दांडेकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या कार्यक्रमासाठी मुरुड तहसीलदार आदेश डफळ, पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे,उपनगराध्यक्ष वीरेन भगत, कोर्लई येथील माऊंट कार्मेल चर्च चे धर्मगुरू फादर बोनाव्हेंचर नुनीस, माजी तहसीलदार नयन कर्णिक, माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर, नगरसेविका प्रांजली मकू, नगरसेवक आदेश दांडेकर, ज्येष्ठ शिवसैनिक प्रमोद भायदे, नगरसेवक पांडुरंग आरेकर, श्रीकांत खोत, डॉ. राज कल्याणी, रायगड प्रेस क्लब अध्यक्ष प्रशांत गोपाळे, मुरूड तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष सिराज शेख, पत्रकार भारत राणजनकर आदींसह सर एस ए हायस्कूल व ओंकार विद्या मंदीर उच्च माध्यमिक शाळेचे विद्यार्थी प्राचार्य, शिक्षक वृंद व विद्यार्थी वर्गाने असंख्य मान्यवर यावेळी उपस्थित होते.

या वेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना जेष्ठ पत्रकार मेघराज जाधव यांनी सांगितले की, हैदराबाद संस्थानातील मराठवाड्याला १७ सप्टेंबर रोजी स्वातंत्र्य मिळाल्याने हा दिवस शासकीय स्तरावर मराठवाडा मुक्ती दिन म्हणून साजरा केला जातो. त्याच धर्तीवर ३१ जानेवारी हा दिवस जंजिरा मुक्ती दिन म्हणून साजरा केला जावा, अशी मागणी रायगड प्रेस क्लब व मुरुड तालुका पत्रकार संघाची असल्याचे सांगितले. हा दिवस शासकीय स्वरूपात होण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांच्याकडे प्रयत्न सुरु असून लवकरच यश प्राप्त होईल, अशी अपेक्षा या वेळी त्यांनी व्यक्त केली.

जंजिरा मुक्ती संग्रामात नानासाहेब पुरोहित, हरिभाऊ भडसावळे, मोहन धारिया, गोविंद लिमये, राजाभाऊ चांदोरकर, दत्तात्रेय कुंटे, सदाशिव बागाईतकर, केशवराव खांबेटे आदी मंडळींनी लढा दिला आणि मोलाची कामगिरी बजावली होती, असे जाधव यांनी आपल्या भाषणात सांगितले.

# नेरळमध्ये रस्ता सुरक्षा अभियान

**कर्जत : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात वाहतूक सप्ताह सुरू असून या वाहतूक सप्ताहाच्या निमित्ताने नेरळ मध्ये वाहतूक सुरक्षा अभियान सुरु आहे. त्यासाठी रायगड जिल्ह्याची वाहतूक शाखा हे अभियान राबवत असून वाहनचालक यांना शिस्तीचे धडे देण्यासाठी वाहतूक शाखेचे पोलिसांकडून अनेक उपक्रम राबविले जात आहेत.



रायगड जिल्हा पोलीस तसेच जिल्हा वाहतूक शाखा रायगड यांच्या माध्यमातून रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात येत आहेत. यामध्ये नेरळ पोलीस ठाण्याच्या माध्यमातून रस्ता सुरक्षा अभियान राबविला जात असून नेरळ वाहतूक पोलीस नितीन अहिरे यांनी वाहन चालकांमध्ये पोचून वाहतुकीचे नियम पाला सुरक्षित रहा सुरक्षित वाहन चालवा यासाठी जनजागृती करताना पाहायला मिळत आहे. यामध्ये रक्षा सुरक्षा अभियान, नागरिकांमध्ये व वाहन चालकांमध्ये वाहतुकीच्या नियमांची व चिन्हांची जनजागृती केली जात आहे, रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत वाहनांवर रिफ्लेक्टर लावण्यात येत आहेत. तसेच वाहतुकीचे नियमही सर्वांपर्यंत पोहोचवले जात आहेत.

दुचाकी वाहन चालवताना हेल्मेटचा वापर करावा, चार चाकी वाहन चालवताना सीट बेल्टचा वापर करावा, वेग मर्यादेपेक्षा अति वेगाने वाहन चालू नये, मद्य प्राशन करून वाहन चालू नये, वाहन चालविताना लेन कटिंग करू नये, पादचाऱ्यांनी नेहमी फूटपाथ चा वापर करावा, वाहन चालविताना मोबाईलचा वापर करू नये, रस्त्यावर धोकादायक रित्या वाहन चालू नये, पादचाऱ्यांनी झेब्रा क्रॉसिंगच्या ठिकाणी रस्ता ओलांडावा, वाहन चालविताना पादचाऱ्यांना प्राधान्य द्यावा. असे अनेक नियम सर्वांनी पालावे जिल्हा वाहतूक शाखेकडून असेही आवाहन केले जात आहे.

वाहतुकीचे नियम पालन न केल्यास पुढील प्रमाणे कारवाही करण्यात येईल यामध्ये लायसन नसताना वाहन चालवणे पाच हजार रुपये दंड, अल्पवयीन मुलांनी वाहन चालवणे पाच हजार रुपये दंड, लायसन जवळ न बालगणे पाचशे रुपये दंड, स्वीट बेल्ट न लावता वाहन चालवणे १००० रुपये दंड, वाहन चालविताना मोबाईलचा वापर करणे पाचशे रुपये दंड, चार चाकी वाहनांना काल्या काचा वापरणे पाचशे रुपये दंड, पोलिसांच्या आदेशाचे पालन न करणे पाचशे रुपये दंड, सार्वजनिक ठिकाणी वाहतुकीस अडथळा निर्माण करणे ५०० रुपये दंड, विना इन्शुरन्स वाहन चालविणे दोन हजार रुपये दंड, मध्ये पण करून वाहन चालवणे कोर्ट द्वारे शिक्षा, या प्रकारे वाहतुकीचे नियम न पाल्यास कारवाई करण्यात येईल असेही सांगण्यात आले. या जनजागृतीसाठी नेरल पोलीस ठाण्याचे वाहतूक शाखेतील नितीन अहिरे यांच्यामार्फत सर्वांपर्यंत पोहचून जनजागृती करत आहेत.

# अंजुमन महाविद्यालयात पारितोषिक वितरण व व्याख्यान



**मुरूड : प्रतिनिधी**

अंजुमन इस्लाम जंजीरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स, मुरूड–जंजीरा चे प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच राष्ट्रीय सेवा योजना व डीएलएलई विभागाच्या संयुक्त विद्यमाने आणि लायन्स क्लब ऑफ श्रीबाग (अलिबाग) यांच्या संयुक्त विद्यमाने मतदार व रस्ता सुरक्षा जनजागृतीपर वक्तृत्व, घोषवाक्य लेखन, निबंध लेखन, पोस्टर निर्मिती व पथनाट्य स्पर्धांचे ऑनलाईन आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ व मानसिक आरोग्यावर व्याख्यान ३१ जानेवारी २०२६ रोजी महाविद्यालयाच्या बहुउद्देशीय सभागृहात उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमात माझा भारत, माझे मत / मतदार जनजागृती या विषयासोबतच रस्ता सुरक्षा : नियम पाळा, जीव वाचवा या विषयांवर विद्यार्थ्यांमध्ये व्यापक जनजागृती करण्यात आली. कार्यक्रमात मानसिक आरोग्य व रस्ता सुरक्षा या विषयावर संस्थापक अध्यक्ष, लायन्स क्लब ऑफ श्रीबाग – अलिबाग लायन डॉ. ॲड. निहा अनिस राऊत यांनी सखोल मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास उपजिल्हा गव्हर्नर लायन प्रविण सरनाईक प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. विशेष पाहुणे म्हणून डॉ. नमिता मिश्रा, लायन डॉ. रेखा म्हात्रे, लायन डॉ अलोक मिश्रा. लायन विजय वनगे, लायन मकरंद कर्णिक यांनी उपस्थिती दर्शविली. लायन प्रविण सरनाईक यांनी युवा वर्गास आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून समाजसेवेसाठी लायन्स इंटरनॅशनलचे महत्त्व नमूद करून त्यांना प्रेरीत केले. तसेच लायन नमिता मिश्रा व लायन डॉ. रेखा म्हात्रे यांनी हि उपस्थिताना शुभेच्छा देऊन मार्गदर्शन केले.

या वेळी प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद शेख यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात अशा स्पर्धांचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्यांची जाणीव, मतदानाबाबतची जबाबदारी तसेच सामाजिक प्रश्नांप्रती सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच २३ महाविद्यालये व ३७१ विद्यार्थ्यांचा सहभाग ही बाब विद्यार्थ्यांमधील सामाजिक जाणीवेचे उत्तम उदाहरण असल्याचे त्यांनी सांगितले. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विजेत्यांना चषक व प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले, तर सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी फातिमा सुरवे व आयेशा देशमुख यांनी प्रभावीपणे पार पाडले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बिस्माह किल्लेदार मॅडम तसेच विद्यार्थी सई कोतवाल यांनी विशेष सहकार्य केले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. फिरोज शेख, सदस्य अल्ताफ फकीर, डीएलएलई विस्तार अधिकारी रहीम बागवान, सदस्य जावेद खान यांनी विशेष परिश्रम घेतले.

# धाटावच्या मोरे महिला महाविद्यालयात हुतात्मा दिन

**रोहा : प्रतिनिधी**

एम. बी. मोरे फाऊंडेशनचे सौ वरदा सुनील तटकरे कला, वाणिज्य आणि विज्ञान महिला महाविद्यालय, धाटाव–रोहा येथे शुक्रवारी हुतात्मा दिन अत्यंत शिस्तबद्ध व भावपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त देशासाठी बलिदान दिलेल्या सर्व हुतात्म्यांना या वेळी आदरांजली वाहण्यात आली.

कार्यक्रमात महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून मौन पाळून श्रद्धांजली वाहण्यात आली. गांधीजींच्या जीवनकार्यावर आधारित विचार मांडले. महात्मा गांधींच्या अहिंसा, सत्य, स्वावलंबन, स्वच्छता आणि सामाजिक समता या तत्वांविषयी उपस्थितांना माहिती देण्यात आली. महाविद्यालयाच्या इतिहास विभाग प्रमुख प्रा. माधुरी जाधव आपल्या भाषणात गांधीजींच्या विचारांची आजच्या काळातील उपयुक्तता स्पष्ट केली. या उपक्रमामुळे विद्यार्थिनींमध्ये राष्ट्रभक्ती, नैतिक मूल्ये आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण झाली.



या वेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व महिला महाविद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत खाली नमूद केलेल्या इसमांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

तरी सदरहू मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, खरेदीखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून **१४ दिवसाच्या** आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषेद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

जमीन मिळकतीचे वर्णन
मौजे – धोधाणी, तालुका – पनवेल, जिल्हा – रायगड

| जुना गट/सर्व्हे नंबर/ उपविभाग / हिस्सा नंबर | नविन जुना गट/सर्व्हे नंबर/ उपविभाग / हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे. आर. पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| ५६/६/अ/२/अ | ४३/६/अ/२/अ | ५ – ८४ – ३५<br>पो. ख. ० – ६० – ००<br>एकुण ६ – ४४ – ३५<br>पैकी मिलींद अनंत पाटील आणि योगेश अनंत पाटील यांच्या मालकीचे क्षेत्र ० – २२ – ०० | ११.४७ |

ठिकाण : पनवेल
दिनांक : ३१/०१/२०२६

सही/–
ॲड. जयवंत एकनाथ भोपी
ॲडव्होकेट

शॉप नं. १३, वरद विनायक कॉम्प्लेक्स, प्लॉट नंबर ४, सेक्टर नंबर ५, गुरूद्वारा समोर, नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील प्रमाणे वर्णन केलेली मिळकत जमीनमालक **श्री. नरेंद्र हरिचंद्र लोंगले** रा. उमरोली, ता. कर्जत, जि. रायगड यांजकडून सदर मिळकत विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे उमरोली, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नं | हिस्सा नं | क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| ५ | ४ | ०–२२–००<br>पो.ख. ०–००–५०<br>एकुण ०–२२–५० | ३.६२ |

तरी सदरहू मिळकतीवर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, वचनचिठठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, वा तत्सम कोणतेही दावे मालकी वा अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबधीतांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तकार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तकारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरून आमचे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी. व सदर मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

**ठिकाण : पनवेल**
**तारिख ३१/०१/२०२६**

**सही/–**
**निलेश द. हातमोडे**
**ॲडव्होकेट**
**मो नं ८१०८५५८२८९**
**पत्ताः शॉप नं १३०, म्युन्सीपल शॉपींग कॉम्पलेक्स, पहिला मजला, भाजी मार्केट जवळ, पनवेल ता. पनवेल, जि. रायगड. ४१०२०६**



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे पोयंजे, तहसील–पनवेल, जिल्हा रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार श्री एल. आर. व्यंकटरमण, यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणेः

**शेतजमीनीचे वर्णन**

मौजे पोयंजे, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील जिल्हा परीषद रायगड, पंचायत समिती पनवेल, मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र: लावणी लायक हे.आर.प्रती | क्षेत्र: पोटखराबा हे.आर.प्रती | क्षेत्र: खाते क्र.४१५ एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|---|
| ११ | १ | ०–५०–०० | ०–००–०० | ०–५०–०० | ०.८४ |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १४ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ३१/०१/२०२६

सही/–
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए., एल. एल. बी.
(खरेदीदाराचे वकील)

**कार्यालयीन पत्ता** – शॉप नं. १५४, पनवेल महानगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, दत्त झेरॉक्सच्यावर, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, मौजे लोणिवली, ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील परिशिष्ट 'अ' मध्ये नमुद केल्याप्रमाणे महसूल अभिलेखात असलेली, ताबेकब्जातील तसेच मालकी हक्काची, भोगवटदार वर्ग २ प्रकारची शेतजमीन मिळकत कु.का. कलम प्रमाणे ४३ नियंत्रित सत्ता प्रकारची खालील वर्णनाच्या शेतजमिन मिळकती आहेत. सदर मिळकतींचे स्वामित्व (Title) हक्क तपासणेकामी खालील शेतजमीन मिळकतींची जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

परिशिष्ट 'अ'
शेतजमिनीचे वर्णन
मौजे लोणिवली, तालुका. पनवेल, जि. रायगड.

| कब्जेदाराचे नाव | गट नं./ सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| लक्ष्मण नारायण मालुसरे | ४ | १ | ०-३७-००<br>पो.ख. ०-०४-५०<br>एकुण ०-४१-५० | ८.८१ |

सबब वर नमुद शेतजमिन मिळकतींवर, वा मिळकतींच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारच्या हक्क, हितसंबध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, ॲटचमेंट, लीज एम.ओ.यु. वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून **१४ दिवसाच्या आत** हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा हितसंबंध नाही असे समजून आम्ही सदर मिळकतींचे स्वामित्वाचा तपशील आमचे अशिलांस देण्यात येईल, त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्यासोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी/नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी.

**तारिख ३१/०१/२०२६**

**सही/–**
**विजय भगत अॅन्ड असोशिएटस्**
**(ॲडव्होकेट अॅन्ड लिगल कन्सलटंट)**
**शॉप नं. १२८, पहिला मजला, नगरपालीका शॉपीग कॉम्पलेक्स पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.**
**मो.९८२०६०७५७२/९३२२६५२३१९**
Email.vijaybhagat43@gmail.com

# उरणच्या हवा गुणवत्ता निर्देशांकात सुधारणा

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यात पावसाच्या सरींमुळे तसेच येथील विविध उद्योगाकडून हवा गुणवत्ता निर्देशांक कमी करण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांचाही परिणाम झाला आहे. त्यामुळे उरणच्या हवा गुणवत्ता निर्देशांकात सुधारणा झाली असून गुरूवारी हा हवा गुणवत्ता निर्देशांक ७० ते १०० ऐक्यआय अंकाच्या दरम्यान नोंदविला गेला होता. त्यामुळे वातावरण ही आल्हाददायक बनले होते.

हवेतील वाढते धूलिकण आणि तापमानामुळे उरणच्या हवा गुणवत्ता निर्देशांकात सतत वाढ होत होती. ही मात्रा ८० ते १५० पेक्षा अधिक नोंदविली होती, मात्र सरीमुळे हवा गुणवत्ता निर्देशांकात सुधारणा झाली आहे. त्यामुळे



वातावरण ही आल्हादायक झाले आहे. यामुळे वातावरण निसर्गरम्य बनले आहे.

उरणच्या वाढत्या हवा प्रदूषण, तापमान आणि आद्रतेचा येथील नागरिकांच्या शरीरावर हानिकारक परिणाम होऊ लागला आहे. गेल्या अनेक महिन्यापासून उरण यामध्ये २०० पेक्षा वर हवेचा निर्देशांक नोंदविण्यात येत होता. ही हवेची प्रदुषित मात्रा मानवी शरीसाठी अतिशय हानीकारक आहे. बदलत्या वातावरणात वाढते तापमान आणि आद्रतेत ही वाढ झाले आहे. हवेतील वाढते धुळीचे प्रमाण याचा परिणाम येथील नागरिकांच्या शरीरावर परिणाम होत आहे. गेल्या काही वर्षापासून उरण हे देशातील हवेतील धुळीकणाच्या कक्षेतील शहरांत नोंदविण्यात आला आहे. अनेकदा अतिशय धोकादायक असलेल्या हवेचा निर्देशांक पार पोहचला होता. ही आकडेवारी हवेतील प्रदूषणाची उच्च पातळी व मानवी शरीरास धोकादायक मानली जात आहे. हवेतील या वाढत्या प्रदूषणामुळे उरणमधील नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे.

जागतिक आरोग्य संस्थेने दक्षता घेत येथील नागरीकांनी मुखपट्टीचा वापर करण्याची सूचना करण्यात येत आहे. यामुळे पर्यावरणवाद्यांनी त्यावेळी चिंता व्यक्त केली होती.हवेची गुणवत्ता पात्रता : हवेतील प्रदूषणाची मात्र ही० ते ५० चांगली ५० ते १०० मध्यम १०० ते १५० आजारी व श्वसन विकारासाठी हानिकारक तर १५० ते २००ची मात्र ही आरोग्यास प्रचंड हानिकारक मानली जाते.

या हवेतील वाढत्या प्रदूषणामुळे उरण मधील जेष्ठ नागरिक व लहान मुलांना श्वसनाचे आजार जडू लागले आहेत. त्यामुळे सामान्य नागरिकांना मुखपट्टी (मास्क) लावण्याची सूचना करण्यात येत आहेत. पावसामुळे हवेतील धुळीकणाचे प्रमाण कमी झाले आहे. त्यामुळे हवेच्या प्रदूषणात घट झाली आहे. परिणामी हवा गुणवत्ता निर्देशांक पर्यावरणीय बनला आहे.

## केळवणे, आपटा परिसरात भाजप महायुतीचा प्रचार

**रसायनी : प्रतिनिधी**



केळवणे जिल्हा परिषदेचे मंगेश रामचंद्र वाकडीकर हे जिल्हा परिषदसाठी उमेदवार आहेत तर आपटामधून आपटा पंचायत समिती मधून मयूर परशुराम शेलार हे आपटा पंचायत समिती गट क्रमांक १६ मधून उभे आहेत.

मंगेश वाकडीकर व मयूर शेलार यांनी दोन दिवसात आपटा व आजूबाजूला सर्व वाड्यावर या पिंजून काढलेल्या आहेत आणि प्रचार केलेला आहे आणि या भागातून त्यांना मोठा पाठिंबा मिळत आहे. मयूर शेलार हे आपटा ग्रामपंचायत सदस्य आहेत व माजी प्रभारी सरपंच व माजी उपसरपंच होते आणि तरुणांमध्ये ते खूप प्रसिद्ध आहेत आणि त्यामुळे सर्व वाड्यावर मधुन मयूर शेलार यांना मोठा पाठीबा मिळतो आहे.

मंगेश वाकडीकर हेदेखील याबाबत खूप सक्रिय असतात. आहेत सर्व ठिकाणी सहकार्यामध्ये हजर असतात आणि व त्या लोकांच्या चांगल्या परिचय आहेत आणि सामाजिक कार्यकर्ते असल्यामुळे मंगेश वाकडीकर पण हे केळवणी जिल्हा परिषद भागातून बाजी मारतील अशी आताचे चित्र आहे.

## कुंभार समाजासाठी इलेक्ट्रिक चाक प्रशिक्षण व वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तुपगाव येथील श्री संत गोरोबा काका मंदिरात खादी ग्रामोद्योग मुंबई व कुंभार समाज सामाजिक संस्था जिल्हा रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने कुंभार काम प्रशिक्षण व इलेक्ट्रिक चाक वाटप कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

हा उपक्रम कुंभार समाज सामाजिक संस्था जिल्हा अध्यक्ष अनंत महाडकर व जिल्हा कार्यकारिणी सदस्य रामदास साळवी यांच्या विशेष प्रयत्नातून मंजूर झाला. कार्यक्रमास खादी ग्रामोद्योग मुंबईचे अधिकारी अरुण कुमार उपस्थित होते. या उपक्रमांतर्गत कुंभार समाजातील २० लाभार्थ्यांची इलेक्ट्रिक चाकांसाठी निवड करण्यात आली आहे. प्रथम सर्व इलेक्ट्रिक चाकांचे पूजन करण्यात आले. या लाभार्थ्यांना इलेक्ट्रिक चाक वापरासंदर्भात १० दिवसांचे प्रशिक्षण देण्यात



येणार असून, प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांना इलेक्ट्रिक चाकांचे वाटप करण्यात येणार आहे. याशिवाय, यापूर्वी पार पडलेल्या ३० दिवसांच्या माती काम प्रशिक्षणातील लाभार्थ्यांना शासनाकडून प्राप्त प्रमाणपत्रांचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमात खादी ग्रामोद्योग मुंबईचे अरुण कुमार, ग्रामसेवक विश्वास वारे, कुंभार समाज रायगड जिल्हा अध्यक्ष अनंत महाडकर व जिल्हा सचिव रामदास साळवी यांनी इलेक्ट्रिक चाक योजनेविषयी माहिती देत आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास श्री उमेश मळवी (दादाजी फाउंडेशन, नाशिक), वसंत महाराज कुंभार (रायगड भूषण), नंदकुमार चिरनेरकर (जिल्हा उपाध्यक्ष), रविंद्र कुंभार, रमेश दहिवलीकर (जिल्हा कार्याध्यक्ष), दिलीप साळवी (जिल्हा सचिव), मधुकर कुंभार (जिल्हा महासचिव), पनवेल तालुका अध्यक्ष बजरंग भागवत, भरत आपटेकर, राजेंद्र साळवी, वसंत कुंभार, प्रवीण कुंभार, संजय शिर्के, सविता मांडलेकर, कांता नागावकर, स्वप्नील नागावकर, सिद्धेश कुंभार, प्रज्वल कुंभार (प्रशिक्षक), सचिन साळवी, सुखदेव सारवे, देवेंद्र कुंभार, यशवंत बिरवाडकर, उद्धव साळवी आदी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमास कुंभार समाजातील बांधव, भगिनी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमामुळे कुंभार समाजातील युवकांना स्वयंरोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होणार असून समाजाच्या आर्थिक सबलीकरणाला चालना मिळणार आहे.

## पनवेल पालिकेकडून हुतात्मा दिन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ आदर व्यक्त करण्यासाठी संपूर्ण देशभर दोन मिनिटे मौन (स्तब्धता) पाळून त्यांना आदरांजली वाहण्यात येते. त्यानुसार पनवेल महापालिका मुख्यालयात शुक्रवारी सकाळी दोन मिनिटे मौन (स्तब्धता) पाळून हा दिवस 'हुतात्मा दिन' म्हणून साजरा करण्यात आला.

या वेळी अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे, उपायुक्त डॉ.वैभव विधाते, उपायुक्त रवीकिरण घोडके, उपायुक्त स्वरूप खारगे, मुख्य लेखा परीक्षक निलेश नलावडे, शहर अभियंता संजय कटेकर, उप अभियंता विलास चव्हाण, लेखाधिकारी संग्राम व्होरकाटे, उप मुख्य लेखा परीक्षक संदीप खुरपे, पशुवैद्यकीय अधिकारी भगवान गीते आदी उपस्थित होते.

## महात्मा गांधी पुण्यतिथीनिमित्त अभिवादन, हुतात्म्यांना आदरांजली

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिकेच्या वतीने महात्मा गांधी पुण्यतिथीनिमित्त प्रशासन विभागाचे उपायुक्त किसनराव पलांडे यांच्या हस्ते महापालिका मुख्यालयातील ॲम्फीथिएटर येथे प्रतिमापूजन करून अभिवादन करण्यात आले. या वेळी सहा.आयुक्त स्वरुपा परळीकर, प्रशासकीय अधिकारी रवी जाधव व शोभा देशमुख तसेच इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

त्याचप्रमाणे हुतात्मा दिनानिमित्त देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ आदरांजली व्यक्त करीत सकाळी ११ वा. ते ११.२ वा. पर्यंत स्तब्ध उभे राहून दोन मिनिटे मौन पाळण्यात आले.



**मोहोपाडा : चांभार्ली येथील रजत मुंढे यांच्या वाढदिवसानिमित्त एक सामाजिक बांधिलकी जपणारा उपक्रम राबविण्यात आला. या निमित्ताने जिल्हा परिषद मराठी शाळा, चांभार्ली व देवळोली राजिप शाळा येथे विद्यार्थ्यांना शालेय व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.**

## रसायनीतील साई मंदिराचा वर्धापन दिन साजरा



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी येथील एच.ओ. सी.श्री साई मंदिराचा भक्तिमय उत्सव सोहळा साई भक्तांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

देवाचीया द्वारी उभा क्षणभरी तेणे मुक्ती चारी साधीयेल्या या हरिपाठामधील बोध वाक्याप्रमाणे साई भक्तांसाठी जणू पर्वणीच होती. साई नामाचा गोडवा गात गात भक्त गणाची पाऊले साईच्या दर्शनासाठी प्रति शिर्डी रसायनी येथे आपोआप वळत होती. जणू काही भक्तीचा महापूर ओसंडून वाहत होता बुधवार श्री साई महिला मंडळ रसायनीच्या वतीने ललिता सहस्त्रणाम व महिलांसाठी हळदी कुंकूच्या कार्यक्रमाने पहिले पुष्प साधारण एक हजार महिला भगिनीच्या साक्षीने गुंफण्यात आले. गुरुवारी मंडळाचे पुजारी श्रीमान दास महाराज यांच्या पौराहित्य खाली दुसरे पुष्प श्री गणेश जयंती निमित्त विणण्यात आले


यामध्ये श्री वास्तुशांती यज्ञ, श्री गणेश पूजन, नवग्रहपूजन, मातृका पूजन, ब्रह्म सावित्री पूजन, श्री गायत्री हवन मान्यवर विश्वस्ताच्या श्री साई सत्संग केंद्राच्या वतीने झाले. संध्याकाळी साई भक्ताच्यावतीने श्री साई बाबा पालखी सोहळा हजारो भक्तांच्या उपस्थितीमध्ये झाला.

पालखी सजावट पि व्ही गायकर यांनी केली. पालखी सोहळाचे संपूर्ण नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष जयवंत अंबवणे व अध्यक्ष एम. एस मगर यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. शुक्रवारचा मुख्य दिवस म्हणजे वसंत पंचमी निमित्त भूपाळी काकड आरती, २७ लीटर दुधाचा अभिषेक, महामंगल स्नान, गणपती होम व रुद्र एकादशी याग मंडळाचे अध्यक्ष एम एस मगर व उपाध्यक्ष जे व्हि अंबवणे व मंडळाचे विश्वस्त व श्री संदेश कदम माजी प्रेसिडंट रिलायन्स कं. यांच्या हस्ते झाला. पौराहित्य मधुसूदन भट गुरुजी नवी मुंबई यांनी केले तसेच दुपारी श्रीची महाआरती होऊन प्रसाद वितरण करण्यात आले.

प्रामुख्याने बाळकृष्ण पाटील डिकसळ, राधाकृष्णा प्रासादिक मंडळ कुंडेवहाळ, ज्ञानेश्वर भजन मंडळ धामणी, व अनेक संगीत प्रेमी यांनी सेवा रुजू केली भजनाची जबाबदारी मंडळाचे उपाधक्ष्य जयवंत अंबवणे आणि बि जे कोंडीलकर यांनी पार पाडली तसेच दहाहजार भक्त गणांनी महाप्रसादाचा आस्वाद घेऊन श्रीसाईबाबाचे कृपा आशीर्वाद प्राप्त केली.

या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन मंडळाचे अध्यक्ष एम एस मगर यांच्या अध्यक्षते खाली पडले तसेच सर्व विश्वस्त सर्वस्वी जयवंत अंबवणे, आर एम पोरे, बी.जे कोंडीलकर, बी आय कागडा, टी. एस. पाटील, नंदकुमार गोगडे, चंद्रकांत बा गाताडे, ज्ञानेश्वर सुर्वे,एन एन मदनकर, ई एस अय्यर, एन डी कोटंबे. ऐ. के. शेळके, मधू अंबवणे, एस बी महाडिक, शिवाजी पाटील, पी एस जांभळे, आर सि धनावत, राजू सैनी, राजू नायक, विठ्ठल कालेकर, एम जे कदम, मंदिर पुजारी व अनेक मान्यवर कार्यकर्ते व अनेक भगिनी यांनी कार्यक्रमाची शोभा वाढवली अशा पद्धतीने साई शेजारती होऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

उपस्थित राहिल्याबद्दल प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष ज्यांनी ज्यांनी सेवा रुजू केली त्यांचे मंडळाच्या वतीने मंडळाचे दुसरे उपाध्यक्ष आर एम पोरे यांनी सर्वांचे गोड आभार मानून कार्यक्रमाची सांगता झाली.





## खोपटा येथे शतकोत्तर अखंड हरिनाम व गुरू दशमी सोहळा

**उरण : बातमीदार**

श्री परमपूज्य सद्गुरु गोपाळकाका महाराज ट्रस्ट, खोपटे बांधपाडा (उरण) यांच्या वतीने शतकोत्तर परंपरेने साजरा होणारा अखंड हरिनाम व गुरु दशमी सोहळा तसेच ज्ञानेश्वरी पारायण महोत्सव यंदाही मोठ्या भक्तिभावात आयोजित करण्यात आला होता. श्रीमद परमहंस जीवनमुक्त स्वामी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या भूमीत सुरू झालेली ही आध्यात्मिक परंपरा आता १०० वर्षांहून अधिक काळ अखंड सुरू आहे.

संतशिरोमणी गोपाळकाका महाराजांनी गृहस्थाश्रमात राहून कीर्तन, अभंग, प्रवचनातून भक्ती, नैतिकता, व्यसनमुक्ती व समाजप्रबोधनाचा संदेश दिला. त्यांच्या जीवनातील आध्यात्मिक अनुभव व जनकल्याणासाठी केलेल्या कार्यामुळे ते जनमानसात संतस्वरूप मानले जातात. त्यांच्या कृपेनेच ही परंपरा पुढे वाढत असून आजही अनेक भक्तांना आध्यात्मिक आधार व मार्गदर्शन मिळत असल्याच्या अनुभूती व्यक्त केल्या जातात.

महोत्सवाचा प्रारंभ माघ शुद्ध षष्ठी, शनिवार २४ जानेवारी २०२६ रोजी झाला असून समारोप माघ शुद्ध द्वादशी, शुक्रवार ३० जानेवारी २०२६ रोजी झाला आहे. राज्यभरातील ख्यातनाम कीर्तनकार – ह.भ.प. संजय महाराज पाटील, ज्ञानेश्वर महाराज शिंदे, रामकृष्ण महाराज मोकळ, ज्ञानेश्वरी महाराज ठाकूर, वामन महाराज भोर, तुषार महाराज पाटील, नंदकुमार महाराज गावंड आदी मान्यवरांची कीर्तनसेवा भाविक भक्तांना लाभली आहे.

ग्रामस्थ, वारकरी, महिला मंडळे, युवक मंडळे आणि भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ट्रस्टचे अध्यक्ष ह.भ.प. श्री हेमवर्ण घनश्याम ठाकूर यांनी व ट्रस्टच्या सर्व सदस्यांनी उत्तम आयोजन व नियोजन केले होते.

## मराठीची समृद्धी दर्शविणारा मायबोली कार्यक्रम

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

विवेकानंद संकुल यांचे प्राथमिक विद्यालय, सानपाडा, यांच्या वतीने मराठी भाषेची समृद्धी दर्शविणारा मायबोली हा कार्यक्रम विष्णुदास भावे नाट्यगृह वाशी या ठिकाणी २९ जानेवारी रोजी संस्थेचे अध्यक्ष डॉ. नंदकिशोर जोशी, अरुंधती जोशी, जनकल्याण बँकेच्या व्यवस्थापक पल्लवी सावंत यांच्या प्रमुख उपस्थित संपन्न झाला.

प्रास्ताविकपर बोलताना शाळेच्या मुख्याध्यापिका ऋतुजा गवस यांनी सांगितले की, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळालेला आहे. मराठी भाषा विविध भागांमध्ये वेगळ्या बोलल्या जातात. अशा विविध बोलल्या जाणाऱ्या मायबोलींचा सर्वांना परिचय व्हावा हा आमचा मुख्य उद्देश आहे. या कार्यक्रमांमध्ये अनेक मायबोलींचा समावेश असलेल्या गीतांचा अंतर्भाव करण्यात आला आहे असे त्यांनी सांगितले. शालेय अहवालाचे वाचन सांस्कृतिक विभाग प्रमुख शुभांगी कांबळे यांनी केले.

या वेळी मार्गदर्शन करताना डॉ. नंदकिशोर जोशी यांनी सांगितले की, छत्रपती शिक्षण मंडळ संस्था फक्त विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यासाठी कार्य न करता समाजातील महत्त्वाचा घटक असलेल्या पालकांसाठीदेखील विविध उपक्रम आयोजित करत असते. विवेकानंद संकुल सानपाडा यांच्या वतीने भावी काळामध्ये शालेय ग्रंथालय पालकांसाठी खुले करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या वेळी संस्थेचे कोषाध्यक्ष विश्वास सोनवणे, अर्चना मानकर, ज्योत्स्ना चौधरी आदी उपस्थित होते. पूर्व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सुवर्षा सागवेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सोहळा झाला.




## एमएनएम विद्यालयाच्या पूर्व प्राथमिक विभागाची चिरनेर येथे क्षेत्रभेट



**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या एम एन एम विद्यालयातील पूर्व प्राथमिक विभागाची क्षेत्रभेट चिरनेर जंगल सत्याग्रहांमधील हुतात्मा स्मारक येथे आयोजित करण्यात आली.

सदरहू क्षेत्रभेटीसाठी पूर्व प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहभाग नोंदवला. चिरनेर येथील जंगल सत्याग्रह स्मारकाला भेट देऊन शिक्षक व विद्यार्थ्यांनी विनम्र अभिवादन केले. सहशिक्षिका वैशाली जोशी यांनी विद्यार्थ्यांना जंगल सत्याग्रह बद्दल माहिती दिली.

विद्यार्थ्यांनी चिरनेर येथील सुप्रसिद्ध श्री महागणपतीचे दर्शन घेतले. सहली दरम्यान, शालेय शिस्तीचे पालन करत सहलीचा आनंद घेतला. शाळेच्या मुख्याध्यापिका सायली वडवलकर, पर्यवेक्षक अरुण जोशी, यांनी विद्यार्थ्यांना सहलीसाठी शुभेच्छा दिल्या. पूर्व प्राथमिक विभागाच्या वैशाली जोशी, सुप्रिया रोकडे प्रणाली गायकवाड यांनी क्षेत्रभेटीसाठी परिश्रम घेतले.

# कर्जतमध्ये महिला शेतकरी गटाची नोंदणी

**कर्जत : प्रतिनिधी**

युनायटेड वे मुंबई, अंधेरी (प.) संस्थेद्वारे कार्यान्वित जल संजीवनी प्रकल्प कर्जत अंतर्गत महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी 'आत्मा' अंतर्गत महिला शेतकरी गटाची यशस्वी नोंदणी करण्यात आली.



महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागांतर्गत कार्यरत असलेल्या कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) यांच्या मार्गदर्शनाखाली खांडस येथील जलसंजीवनी महिला शेतकरी गट, खांडस येथील शेतकऱ्यांनी एकत्र येऊन गटाची आत्मा अंतर्गत यशस्वीरीत्या नोंदणी केली आहे. महिला शेतकऱ्यांना संघटित करून त्यांना आधुनिक तंत्रज्ञान आणि हक्काची बाजारपेठ मिळवून देण्यासाठी हा पुढाकार युनायटेड वे मुंबई संस्थेद्वारे घेण्यात आला आहे. महिला शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, शेतीपूरक व्यवसाय (उदा. रोपवाटिका, शेळीपालन, प्रक्रिया उद्योग, गांडूळ खत निर्मिती, मशरूम उत्पादन इ.) सुरू करणे आणि गटाच्या माध्यमातून सामूहिक शेतीला आणि जोडधंदेना चालना देणे असा उद्देश आहे. प्रशिक्षण आणि तंत्रज्ञान: 'आत्मा' यंत्रणेमार्फत या गटाला प्रगत शेती तंत्रज्ञान, कौशल्य विकास आणि काढणीपश्चात व्यवस्थापन या विषयांवर तज्ज्ञांकडून प्रशिक्षण दिले जाणार आहे.

शासकीय लाभ: नोंदणीकृत गटाला शासनाच्या विविध योजनांचा लाभ, फिरता निधी आणि प्रदर्शनांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. या नोंदणी प्रक्रियेसाठी प्रकल्प संचालक श्रीमती वंदना शिंदे (आत्मा) तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक रेश्मा मते, तालुका कृषी अधिकारी दिनेश कोळी यांचे मोलाचे सहकार्य लाभले तसेच सहायक कृषी अधिकारी अनिल रुपनवर आणि गुणवंत पाटील यांनी कृषी विभागाच्या योजना सविस्तर समजावून सांगितल्या. यावेळी गटाच्या अध्यक्ष सुरेखा ऐनकर, सचिव आशा ऐनकर आणि उपाध्यक्ष गायत्री ऐनकर उपस्थित होत्या.

आतापर्यंत गटाने एकूण कलम ४९३१ रोपे, रायवळ व तुरीची रोपे प्रत्येकी १८ हजार असा रोपवाटिकेतून तीन लाख रुपये नफा कमावला तसेच गुणवत्तापूर्ण गांडूळखत दोन टन १६ क्विंटल तयार करून पाली, पुणे, इ. ठिकाणी विकले, ज्यातून त्यांना २६१६० रुपये नफा झाला असून सध्या गटाकडे आठ टन खत विक्रीसाठी उपलब्ध आहे.

# जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षकांची निवडणूकपूर्व पाहणी



**चौक : प्रतिनिधी**

रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे आणि जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी खालापूर तालुक्यातील मतदान प्रक्रिया व पूर्वतयारीची पाहणी करून मार्गदर्शन केले.

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका नियमानुसार पार पाडण्यासाठी निवडणूक आयोगामार्फत सर्व आवश्यक खबरदारी घेण्यात येते. यामध्ये मतदानाची नोंद करणारे मतदान यंत्र, त्याची निगराणी आणि सुव्यवस्थित या बाबी विशेषत्वाने महत्वाच्या ठरतात. या दृष्टीने ईव्हीएमच्या सुरक्षेबाबत प्राधान्याने आवश्यक ती विशेष काळजी निवडणूक यंत्रणेकडून घेतली जाते.

यासाठी खालापूर पंचायत समिती येथे स्ट्राँग रूम तयार करण्यात आली आहे. त्याची पाहणी करण्यात आली आहे. या वेळी खालापूर तहसीलदार अभय चव्हाण, गटविकास अधिकारी संदीप कराड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार, निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड उपस्थित होते.

# वैजनाथ शाळेत ग्रामसमृद्धी अभियान

## विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तू भेट

**कर्जत : प्रतिनिधी**

जीवन विद्या मिशन आणि रुमारा इंजिनिअरिंग कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने कर्जत तालुक्यातील वैजनाथमधील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत ग्रामसमृद्धी अभियान राबविण्यात आले. या वेळी आदिवासी विद्यार्थी तसेच इतर विद्यार्थ्यांना शालेय भेटवस्तूचे वाटप करण्यात आले तसेच सर्व विद्यार्थ्यांना जीवन विद्या मिशनच्या संस्कार शिक्षणाविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

मुख्यध्यापक आकाराम पाटील यांनी उपस्थितांचे स्वागत केले. या विद्यार्थ्यांना सद्गुरू वामनराव पै यांनी दिलेला दिव्य संदेश तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार आपल्या जीवनात उतरवून, प्रामाणिकपणे अभ्यास करून प्रगतिपथावर जाण्याची प्रेरणा देण्यात आली. जीवन विद्येच्या वतीने विश्वस्त प्रमोद रासम आणि व्याखाते सुजित धावडे यांनी मुलांना मार्गदर्शन केले.

रुमारा ईजिनिअरिंग कंपनीचे राजेश पिंगळे, रुपाली पिंगळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मुलांना व्यसनापासून दूर कसे रहायचे? प्रतिकूल परिस्थितीचा सामना कसा करायचा? यावर स्वाअनुभव सांगून मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास ज्ञानसाधना केंद्र दादरचे दत्ता पेडणेकर, उर्मिता राणे, समिधा डिचोलकर, सुवर्णा जाधव, प्राजक्ता रासम, अमेय नांदगावकर, पूजा नांदगावकर यांच्यासह शिक्षक उपस्थित होते.



# तरुणांना रोजगार देणार –साबळे



**माणगाव : प्रतिनिधी**

निजामपूर जिल्हा परिषद मतदारसंघातील बेरोजगारी ही गंभीर समस्या असून येथील तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हेच आपले प्रमुख ध्येय असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार ॲड. राजीव साबळे यांनी प्रचारादरम्यान बोलताना सांगितले.

सध्या तात्पुरत्या स्वरूपात काम करणाऱ्या तरुणांना कायमस्वरूपी रोजगार मिळावा यासाठी उद्योगांशी समन्वय साधून ठोस पावले उचलण्याचे अभिवचनही त्यांनी दिले.

एमआयडीसी परिसरातील विरोधकांची हप्तेखोरी आणि कमिशनशाही बंद करून स्थानिक तरुणांना जास्तीत जास्त नोकऱ्या मिळाव्यात यासाठी आपण कोणतीही तडजोड न करता लढा देणार असल्याचा ठाम आत्मविश्वास ॲड. साबळे यांनी व्यक्त केला.

स्थानिक युवक हा माझा केंद्रबिंदू आहे. युवकांसाठी नोकरीसोबतच पर्यटन क्षेत्रातून स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि आवश्यक पाठबळ देण्यावर विशेष भर देण्यात येणार असल्याचे ॲड. साबळे यांनी नमूद केले.

निजामपूर जिल्हा परिषद मतदार संघाचा शाश्वत विकास, रोजगारनिर्मिती आणि स्वच्छ प्रशासन या त्रिसूत्रीवर आधारित सर्वांगीण विकास घडवून आणण्याचा संकल्प व्यक्त करत जनतेच्या विश्वासाला न्याय देण्यासाठी कार्यरत राहिन, असा भावनिक संदेशही त्यांनी प्रचार करतेवेळी दिला.

# शेकाप कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश

**नागोठणे : बातमीदार**

शिवसेनेचे मुख्य नेते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाने प्रेरित होऊन, मंत्री भरत गोगावले आणि आमदार महेंद्र दळवी यांच्या आशीर्वादाने तसेच शिवसेना रोहा तालुकाप्रमुख ॲड. मनोज कुमार शिंदे यांच्या सूचनेनुसार व उपतालुकाप्रमुख मनोज खांडेकर, नागोठणे जिल्हा परिषद निवडणुकीचे उमेदवार सुमित काते यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून वरवठणे पंचशील नगरमधील शेकाप कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला.

नागोठणेजवळील वरवरठणे ग्रामपंचायतीच्या प्रभाग क्रमांक १ मध्ये समाविष्ठ असलेल्या पंचशील नगरमधील शेकापचे विद्यमान सदस्य, युवा नेतृत्व रोशन दाभाडे यांच्या नेतृत्वाखाली स्वप्निल मोरे, ऋतिक दाभाडे, राकेश दाभाडे, सतेज दाभाडे, आकाश पवार, विकास गवळी, नयन गायकवाड आदी कार्यकर्त्यांनी शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश करून सुमित काते यांना वरवठणे गावातून मताधिक्य मिळवून देण्याचा निर्धार व्यक्त केला.

या पक्षप्रवेश कार्यक्रमास शिवसेनचे रोहा उपतालुकाप्रमुख मनोजदादा खांडेकर, अशोक कोतवाल, खेलू खांडेकर यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते. या प्रवेशामुळे नागोठणे मोहल्ल्यात शिवसेनेची संघटनात्मक ताकद अधिक सक्षम झाली आहे.

आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेला मोठे बळ मिळाले असल्याचे रोहा उपतालुका प्रमुख खांडेकर यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.



# भिवपुरी रोड स्टेशन येथे पार्क केलेल्या दुचाकीची चोरी

**कर्जत : प्रतिनिधी**

आसल ग्रामपंचायती हद्दीतील चिंचवाडीमधील एक तरुण नोकरीसाठी उपनगरीय लोकलने जात असताना त्याने आपली दुचाकी भिवपुरी रोड रेल्वेस्थानकात पार्किंग केली होती. या आदिवासी तरुणाच्या दुचाकीची चोरी झाली असून याबाबत नेरळ पोलिसांकडे तक्रार करण्यात आली आहे.

चिंचवाडी येथे राहणारा गणेश शिवाजी उघडे गेली दोन वर्षे भिवपुरी रोड रेल्वेस्थानकात आपली दुचाकी लावून कामावर जात असतो. एनएस १६० या कंपनीची एमएच ४६ सीपी २३६१ या क्रमांकाची दुचाकी पार्क करून तो नेहमीप्रमाणे मुंबईतील दादर या ठिकाणी खासगी कंपनीमध्ये नोकरीसाठी निघून गेला होता. तो रोज पहाटे साडेचारची लोकल पकडून कामावर जात असे. दिवसभरामध्ये काम करून पुन्हा लोकल पकडून परतीचा प्रवास करून भिवपुरी स्टेशन येथे संध्याकाळी साडेपाच वाजता पोहचला असता नेहमीच्या जागेवर त्यांची दुचाकी आढळून आली नाही. त्यानंतर परिसरातही कुठे त्याला त्याची दुचाकी आढळून आली नाही. त्यामुळे गणेश उघडे या तरुणाने नेरळ पोलीस ठाणे येथे जाऊन आपली दुचाकी हरवली आहे याची रीतसर तक्रार नोंदवली. पोलिसांनी तक्रारीची दखल घेत तपास सुरू केला आहे.

# उड्डाण महोत्सवात टिकमभाई मेथा कॉलेजचे यश




**माणगाव : प्रतिनिधी**

पोलादपूर येथे मुंबई विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभाग (डीएलएलई) आणि सुंदरराव मोरे महाविद्यालय, पोलादपूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'उड्डाण महोत्सव २०२६' चे आयोजन करण्यात आले होते.

या महोत्सवाचे उद्घाटन मुंबई विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे प्राध्यापक डॉ. कुणाल जाधव यांच्या हस्ते झाले. या महोत्सवात माणगाव येथील जे.बी. सावंत एज्युकेशन सोसायटीचे टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेज यांनी पथनाट्य स्पर्धेत सहभाग घेऊन उत्तेजनार्थ पारितोषिक मिळवले. देशभक्ती या विषयावर 'भारत' हे पथनाट्य सादर करण्यात आले. हे पथनाट्य एफवायबीकॉमचे विद्यार्थी पूर्वा मतकर, अर्चिता बांदल, प्रगती लोभी, मनस्वी लोखंडे, प्रीती बेंडुगडे, तृप्ती मोरे, सुरज भावेकर, अथर्व अधिकारी, उमाकांत भगत यांनी सादर केले.

या यशाबद्दल प्राचार्य डॉ. अमृता देशमुख तसेच संस्थेचे सेक्रेटरी नानासाहेब सावंत यांनी सर्व सहभागी विद्यार्थी, डीएलएलई समन्वयक व ग्रंथपाल अमित बाकाडे यांचे कौतुक केले.

या उपक्रमासाठी सहाय्यक म्हणून ज्युनिअर कॉलेजचे शिक्षक भारत पवार तसेच शिक्षकेतर कर्मचारी दिनेश कुळे व दिलीप चव्हाण यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

या कार्यक्रमात जिल्ह्यातील १८ महाविद्यालयांमधील ३००हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते. आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. नाथीराम राठोड व त्यांच्या सहकाऱ्यांनी उड्डाण महोत्सवासाठी परिश्रम घेतले.

# 'मिरानगर ग्रामस्थांना हक्काची घरे मिळवून देणार'

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे मिरानगरचा आम्ही गेले २५ वर्ष विविध स्तरावर विकास करत आलेलो आहोत. त्यामुळे मिरानगर ग्रामस्थ प्रत्येक निवडणुकीत आम्हाला सहकार्य करीत आलेले आहेत. आता जिल्हा परिषद निवडणुकीनंतर खासदार सुनील तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली मिरानगर गावठाणमध्ये वनखात्याचा जो शिक्का लागलेला तो बाहेर काढून ग्रामस्थांना त्यांची हक्काची घरे मिळवून देणार असल्याचे अभिवचन राष्ट्रवादी काँग्रेस व भाजप युतीचे नागोठणे जिल्हा परिषद उमेदवार किशोर जैन यांनी दिले.

या वेळी गुड्डू पानसरे, समीर कुरेशी, इकबाल हमदुले, बबलू पटेल, अबू पानसरे, राजू नेरेकर, भाई मसालेवाले, अकबर मसालेवाले, असिफ मसालेवाले आदी मिरानगर ग्रामस्थांनी किशोर जैन यांना पाठिंबा दिला. त्या वेळी ते बोलत होते.

राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते असगर मुल्ला, बबलू खंडागळे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.





**खोपोली : खालापूर तालुक्यातील महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी नवनिर्वाचित नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे यांनी प्रचारात सहभाग घेतला. या वेळी त्यांनी भाजपच्या जिल्हा परिषद उमेदवार रेश्मा राजेश पाटील यांचा प्रचार करून त्यांच्यासह महायुतीच्या सर्व उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन मतदारांना केले. सोबत आत्करगाव ग्रामपंचायतीचे माजी सरपंच संदीप पाटील व इतर.**

# माऊंट कार्मेल हायस्कूल येथे पारितोषिक वितरण

## दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील माऊंट कार्मेल हायस्कूल कोर्लई येथे ज्या शालेय विद्यार्थ्यांनी इयत्ता पहिली ते दहावी या इयत्तांमध्ये प्रथम, द्वितीय क्रमांक पटकावला त्यांचा वार्षिक पारितोषिक वितरण आणि इयत्ता दहावीमधील विद्यार्थ्यांना निरोप समारंभ नुकताच झाला.

कार्यक्रमासाठी शाळेचे चेअरमन रेव्ह. फादर बोनव्हेंचर नूनीस, मुख्याध्यापिका सिस्टर ज्युली चांदी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



या वेळी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. या विद्यार्थ्यांनी आमच्या शिक्षकांनी आम्हाला शिकवण्यासाठी जी मेहनत घेतली त्याबद्दल आभार मानून आम्ही दहावीचा निकाल शंभर टक्के लावून या शाळेचे नाव प्रकाशझोतात आणू, असा आत्मविश्वास व्यक्त केला.

इयत्ता नववीतील विद्यार्थिनी जिज्ञासा कमळ नाखवा हिने वर्ग माझा स्वर्ग होता. याबाबत एक उत्कृष्ट कविता सादर करून उपस्थितांची मने जिंकली. वरिष्ठ शिक्षक राजेंद्र घोसाळकर यांनी मार्गदर्शन करून परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. सुरेश वेगस यांनी इयत्ता दहावीमधील विद्यार्थ्यांनी जेव्हा पाचवीपासून आपला प्रवास सुरू केला त्या वेळच्या गोड आठवणी सांगितल्या. मुख्याध्यापिका सिस्टर ज्युली चांदी यांनी शाळेचा निकाल शंभर टक्के लावून या शाळेचे नाव उज्ज्वल करण्याचे आवाहन केले. शाळेचे चेअरमन रेव्ह. फादर बोनव्हेंचर नूनीस यांनी आपले आई–वडील मुलांच्या शिक्षणासाठी खूप कष्ट करून लागणारी शैक्षणिक साधने व फी भरीत असतात. परीक्षेमध्ये यश मिळण्यासाठी आपल्या आई–वडिलांचे कष्ट नजरेसमोर ठेवून जोमाने अभ्यास करून उत्कृष्ट मार्क मिळविण्याचा प्रयत्न करा, असे सांगितले.

गुणवंत विद्यार्थी व शालेय क्रीडा स्पर्धेत यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार चेअरमन रेव्ह. फादर बोनव्हेंचर नूनीस यांच्या हस्ते ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन करण्यात आले. चित्रकलेतील एलिमेंटरी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. आभार शोधन बलकवडे यांनी मानले.

# गुजरात डब्ल्यूपीएलच्या प्लेऑफमध्ये

**वडोदरा : वृत्तसंस्था**



वूमन्स प्रीमियर लीगच्या (डब्ल्यूपीएल) चौथ्या हंगामातील प्लेऑफसाठी महत्त्वपूर्ण असलेल्या सामन्यात गत चॅम्पियन मुंबई इंडियन्सला पराभूत करत ॲशली गार्डनरच्या नेतृत्वाखालील गुजरातच्या संघाने प्लेऑफमध्ये एन्ट्री मारली आहे. कमालीची गोष्ट म्हणजे डब्ल्यूपीएलच्या इतिहासात पहिल्यांदाच गुजरात जाएंट्सच्या संघाने मुंबई इंडियन्सला पराभूत केले आहे.

ॲशली गार्डनरने या सामन्यात नाणेफेक जिंकून पहिल्यांदा फलंदाजीचा निर्णय घेतला होता. कर्णधार शलीसह ४६ (२८), अनुष्का शर्मा ३३ (३१), सोफी डिवाइन २५ (२१) आणि जॉर्जियाने ४४ (२६) केलेल्या उपयुक्त खेळीच्या जोरावर गुजरातच्या संघाने पहिल्यांदा फलंदाजी करताना निर्धारित २० षटकात चार विकेट्सच्या मोबदल्यात १६७ धावा करत मुंबई इंडियन्ससमोर १६८ धावांचे टार्गेट सेट केले होते.

१६८ धावासंख्येचा पाठलाग करताना मुंबई इंडियन्सची सुरुवात खराब झाली. संघाच्या धावफलकावर अवघ्या २३ धावा असताना हेली मॅथ्यूजच्या रुपात संघाने पहिली विकेट गमावली. ती फक्त सहा धावांचे योगदान देऊन परतली. सजीवन सजनाने २५ चेंडूत २६ धावांची खेळी केली. संघ अडचणीत असताना हरमनप्रीत कौरने कॅप्टन्सीला साजेशी खेळी करत संघाला सामन्यात आणले. शेवटपर्यंत मैदानात थांबलेल्या हमरनप्रीतने ४८ चेंडूत आठ चौकार आणि चार षटकारांच्या मदतीने ८२ धावांची खेळी केली, पण शेवटी मुंबईचा संघ ११ धावांनी कमी पडला.

डब्ल्यूपीएलच्या यंदाच्या हंगामात स्मृती मानधनाच्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या संघाने थेट फायनल गाठली आहे. आता त्यांच्यापाठोपाठ गुजरात जाएंट्सच्या संघाने आठपैकी पाच विजयासह १० गुण खात्यात जमा करत प्लेऑफमध्ये एन्ट्री मारली आहे. आता उर्वरित एका जागेसाठी मुंबई इंडियन्सला संधी आहे, पण त्यांचे भवितव्य दिल्ली कॅपिटल्सच्या निकालावर अवलंबून आहे. मुंबईच्या संघाने आठ सामन्यात तीन विजयासह सहा गुण कमावले आहेत. सध्याच्या घडीला मुंबई इंडियन्सचा संघ गुणतालिकेत तिसऱ्या स्थानावर आहे, पण दिल्ली कॅपिटल्सचा संघ त्यांना या स्थानावरून खाली खेचून प्लेऑफ गाठू शकतो.

जेमिमाचा दिल्ली कॅपिटल्स आणि यूपी वॉरियर्स यांच्यात डब्ल्यूपीएलच्या यंदाच्या हंगामातील शेवटचा साखळी सामना खेळवण्यात येणार आहे. या सामन्यात दिल्ली संघाने विजय मिळवला, तर एलिमिनेटरच्या लढतीत ते गुजरातला भिडतील. जर दिल्लीच्या पदरी पराभव पडला, तर मुंबई इंडियन्ससाठी आणखी एक संधी मिळेल.

## राष्ट्रीय मास्टर्स स्पर्धेत रायगडातील खेळाडूंची नेत्रदीपक कामगिरी

**उरण : बातमीदार**




मास्टर्स गेम्स असोसिएशन आयोजित पहिली संयुक्त राष्ट्रीय मास्टर्स स्पर्धा २०२६ नाशिक येथे नुकतीच झाली. या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील खेळाडूंनी नेत्रदीपक कामगिरी केली.

३५ वर्षांवरील गटात उरणमधील स्नेहल राम पालकर यांनी ४०० मीटर धावणे, ८०० मीटर धावणे आणि थाळीफेक या खेळांमध्ये सुवर्णपदक पटकाविले. महिलांमध्ये चेतना स्नेहल पालकर यांनी ४०० धावणे, ८०० मीटर धावणे आणि तिहेरी उडीमध्ये सुवर्णपदक प्राप्त केले. समाधान चांगू कणेकर यांनी ४०० मीटर हर्डल्समध्ये सुवर्ण आणि १५०० मीटर धावणे रौप्य तसेच २०० मीटर धावणे शर्यतीत कांस्यपदक प्राप्त केले.

खोपोली येथील सहकारी अमित पांडुरंग विचारे यांनी ४० वर्षांवरील पुरुष गटात १० हजार मीटर धावणे, पाचह हजार मीटर धावणे, १५०० मीटर धावणे या शर्यतीत सुवर्णपदक जिंकले. तर दिलीप विचारे यांनी ५५ वर्षांवरील पुरुष गटामध्ये २०० मीटर धावणेमध्ये कांस्यपदक, महेश भोसले यांना पाच किमी जलद चालणे या प्रकारात रौप्यपदक, मनीष खवळे यांना बांबू उडीमध्ये कांस्यपदक, दत्ता दांगड यांना नेमबाजी स्पर्धेत कांस्यपदक मिळाले.

रूपेश म्हात्रे यांनी उंच उडी, ११० मीटर अडथळा शर्यतीमध्ये सुवर्णपदक आणि तिहेरी उडीमध्ये कांस्यपदक प्राप्त केले. विश्वास खुटले यांनी भालाफेक स्पर्धेत रौप्यपदक मिळविले तसेच या सर्वांनी रिले आणि मिक्स रिले या दोन स्पर्धांमध्ये महाराष्ट्र संघाकडून खेळताना सुवर्ण आणि रौप्यपदक प्राप्त करून प्रथम क्रमांकाची चॅम्पियनशिप मिळवून देण्यात मोठे योगदान दिले. या यशाबद्दल सर्वांचे अभिनंदन होत आहे.

## रायगड जिल्हास्तरीय क्लासिक स्पर्धा आज खांदा कॉलनीत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगडच्या वतीने जिल्हास्तरीय क्लासिक सबज्युनिअर, ज्युनियर, सीनियर, मास्टर (पुरुष व महिला) स्पर्धा १ फेब्रुवारी रोजी आगरी शिक्षण संस्थेचे शैक्षणिक संकुल, खांदा कॉलनी सेक्टर ६ येथे आयोजित करण्यात आली आहे.

स्पर्धा सकाळी ८ ते सायंकाळी ६ या वेळेत होणार आहेत. या स्पर्धेचे उद्घाटन रायगड जिल्ह्याचे क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ यांच्या हस्ते होणार आहे. स्पर्धेस महाराष्ट्र पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे सचिव आंतरराष्ट्रीय पंच व राष्ट्रीय संघटनेचे सहसचिव संजय सरदेसाई (शिवछत्रपती पुरस्कार सन्मानित) हे विशेष निरीक्षक म्हणून येणार आहेत. त्याचप्रमाणे शिवछत्रपती पुरस्कार सन्मानित अनंत चाळके, संजय माधव, सतीश पाताडे, सनदी लेखापाल यशवंत गोळे, असोसिएशनचे अध्यक्ष गिरीश वेदक, कार्याध्यक्ष यशवंत मोकल, पनवेल तालुका मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष पंकज भगत, प्रा. नवनाथ गायकर आदी उपस्थित राहणार आहेत

स्पर्धेसाठी राज्य पंच गोपीनाथ पवार, अंकुश सावंत, राजेश शिर्के, विशाल मुळे, राष्ट्रीय पंच उत्तम धुरी, कारभारी, गुरुदत्त भोईर आदी काम पाहतील. स्पर्धा प्रमुख म्हणून सहसचिव सचिन भालेराव असून व्यवस्थापक म्हणून संदीप पाटकर, सुभाष टेंबे, संदीप पाटकर जबाबदारी सांभाळतील.

## टी-२० वर्ल्डकपसाठी ऑस्ट्रेलियाचा संघ जाहीर

### कमिन्स दुखापतीमुळे स्पर्धेबाहेर, तर स्मिथला पुन्हा डावलले

**मेलबर्न : वृत्तसंस्था**



येत्या ७ फेब्रुवारीपासून भारत आणि श्रीलंका यांच्या संयुक्त यजमानपदाखाली खेळवल्या जाणाऱ्या टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी ऑस्ट्रेलियाने आपला अंतिम १५ सदस्यीय संघ जाहीर केला आहे, मात्र स्पर्धेपूर्वीच 'कांगारूं'ना मोठा धक्का बसला असून स्टार वेगवान गोलंदाज पॅट कमिन्स दुखापतीमुळे स्पर्धेतून बाहेर झाला आहे. दुसरीकडे अनुभवी फलंदाज स्टीव्ह स्मिथला पुन्हा एकदा डावलण्यात आले आहे.

ऑस्ट्रेलियन निवड समितीने जाहीर केलेल्या अंतिम संघात एकूण दोन महत्त्वाचे बदल केले आहेत. पाठीच्या दुखापतीमुळे त्रस्त असलेल्या पॅट कमिन्सच्या जागी डावखुरा वेगवान गोलंदाज बेन ड्वार्शियस याचा समावेश करण्यात आला आहे तसेच सलामीवीर फलंदाज मॅथ्यू शॉर्टला डच्चू देऊन त्याच्या जागी मॅथ्यू रेनशॉला संघात स्थान दिले आहे. 'बिग बॅश'मध्ये चमकदार कामगिरी करूनही स्मिथला विश्वचषकाचे तिकीट मिळालेले नाही.

ऑस्ट्रेलियासाठी दिलासादायक बाब म्हणजे जोश हेझलवूड, टिम डेव्हिड आणि नॅथन एलिस या तिघांनाही तंदुरुस्त घोषित करण्यात आले आहे. हेझलवूड हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे शेस मालिकेपासून मैदानाबाहेर होता, तर टिम डेव्हिड आणि नॅथन एलिस यांनीही दुखापतीमुळे अलीकडच्या अनेक मालिका गमावल्या होत्या.

निवड समितीचे सदस्य टोनी डोडमाइड यांनी बदलांचे समर्थन करताना सांगितले की, पॅट कमिन्सला दुखापतीतून सावरण्यासाठी अधिक वेळ हवा आहे. बेन ड्वार्शियस हा एक उत्तम पर्याय असून तो वेगवान गोलंदाजीसोबतच खालच्या फळीत उपयुक्त फलंदाजी आणि चपळ क्षेत्ररक्षण करू शकतो तसेच श्रीलंकेतील फिरकीला पोषक खेळपट्ट्या लक्षात घेता मॅथ्यू रेनशॉ मधल्या फळीत संघाला मजबूती देईल.

## सिन्नरचे चक्रव्यूह भेदत जोकोविच ऑस्ट्रेलियन ओपनच्या फायनलमध्ये

### ■ आता अंतिम सामना अल्काराझशी

**मेलबर्न : वृत्तसंस्था**



ऑस्ट्रेलियन ओपनच्या दुसऱ्या सेमीफायनलमध्ये सर्बियन दिग्गज टेनिस स्टार नोवाक जोकोविचने इटालियन यानिक सिन्नरला थरारक आणि रंगतदार सामन्यात पराभूत केले. या विजयासह जोकोने कारकिर्दीतील ११व्या ऑस्ट्रेलियन ओपन फायनलमध्ये धडक मारली आहे.

दहावेळचा ऑस्ट्रेलियन ओपन विजेता असलेल्या जोकोविचने दोनदा सेटमध्ये पिछाडीवर पडूनही दमदार पुनरागमन करत गत विजेत्या सिन्नरला ३-६, ६-३, ४-६, ६-४, ६-४ असे पराभूत केले. आता फायनलमध्ये जोकोविचची गाठ जागतिक क्रमवारीत अव्वल असलेल्या कार्लोस अल्काराझशी पडणार आहे. त्याने पहिल्या सेमीफायनलमध्ये दुखापतीशी झुंज देत अलेक्झांडर झ्वेरेव्हवर पाच सेट्सच्या थरारक लढतीत विजय मिळवला होता.

मागील दोन वर्षांहून अधिक काळापासून जोकोविच हा सिन्नरविरुद्ध विजय मिळवण्यात अपयशी ठरताना पहायला मिळाले होते. अखेर त्याचे चक्रव्यूह भेदत जोकोविचने फायनलच तिकीट मिळवले आहे.

## सॅम कुरेनने हॅट्ट्रिक घेत सामनाच वळवला

**पल्लेकेले : वृत्तसंस्था**



सॅम कुरेन याने श्रीलंकेविरुद्ध पल्लेकेलेच्या मैदानात रंगलेल्या पहिल्या आंतरराष्ट्रीय टी-२० सामन्यात अप्रतिम पुनरागमन करत हॅट्ट्रिकचा डाव साधला आहे. श्रीलंकेच्या डावातील सुरुवातीच्या एका षटकात त्याने २० धावा खर्च केल्या होत्या, पण त्यानंतर त्याने १६व्या षटकात श्रीलंकेच्या बॅटरच्या पोटात गोळा आणणारी गोलंदाजी करत हॅट्ट्रिकचा डाव साधला. चार धावा खर्च करत त्याने तीन विकेट्स घेत सामना इंग्लंडच्या बाजूने वळवला.

सॅम कुरेन याने सलग तीन चेंडूंवर दासून शनाका, महीश थीक्षाना आणि मथीशा पाथिराना यांना बाद केले. पावसाच्या व्यत्ययामुळे श्रीलंका आणि इंग्लंड यांच्यातील सामना प्रत्येकी १७-१७ षटकांचा करण्यात आला होता. डेथ ओव्हरमध्ये आपल्या गोलंदाजीची धार दाखवून देताना कुरेन याने हॅट्ट्रिकसह खास विक्रमाला गवसणी घातली. इंग्लंडच्या संघाकडून टी-२० सामन्यात हॅटट्रिकचा डाव साधणारा तो दुसरा गोलंदाज ठरला आहे. याआधी २०२४च्या टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत अमेरिकेविरुद्ध ख्रिस जॉर्डनने ही कामगिरी केली होती. विशेष म्हणजे, टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांत श्रीलंकेविरुद्ध हॅट्ट्रिक घेणारा कुरेन हा सहावा गोलंदाज आहे.

नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करताना इंग्लंडच्या संघाने श्रीलंकेला केवळ १३३ धावांत रोखले. यजमान संघाने जोरदार सुरुवात केली होती. कुसल मेंडिसने अवघ्या २० चेंडूंत ३७ धावांची खेळी करत सात षटकांच्या खेळानंतर संघाच्या धावफलकावर ७६ धावा लावल्या होत्या. आदिल रशीद आणि लियाम डॉसन यांनी मिळून पाच विकेट्स घेत सामन्याची दिशा बदलली. जेमी ओव्हर्टननेही दोन फलंदाजांना तंबूचा रस्ता दाखवला.

१ बाद ७६ धावा अशा मजबूत स्थितीत असणाऱ्या श्रीलंका संघाने ९८ धावांवर सहा विकेट्स गमावल्या. सॅम कुरेन याने पहिल्या दोन षटकांत ३४ धावा दिल्या होत्या, पण शेवटच्या षटकात हॅट्ट्रिकचा डाव साध त्याने आपला स्पेल ३८ धावा खर्च करून संपवला.




## राष्ट्रीय कराटे स्पर्धेत प्रेक्षा यादवला 'रौप्य'

**नागोठणे : बातमीदार**

नागोठण्याजवळील सुकेळी येथील जिंदल माऊंट लिट्रा झी स्कूलची विद्यार्थिनी प्रेक्षा अमर यादव हिने ४३व्या राष्ट्रीय कराटे स्पर्धेत रौप्यपदक पटकाविले. ही स्पर्धा नुकतीच गुवाहटी (आसाम) येथे आयोजित करण्यात आली होती.

या यशाबद्दल जिंदल माऊंट लिट्रा झी स्कूलच्या प्राचार्य तनुजा झा, उपप्राचार्य स्वागतिका साहू, शिक्षकवृंद आणि प्रशासकीय कार्यालय विभागाकडून तिचे कौतुक व अभिनंदन करण्यात आले.

## अमेरिकन टी-२० वर्ल्डकप संघाच्या कर्णधारपदी भारतीय वंशाचा खेळाडू

**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

भारत आणि श्रीलंका यांच्या यजमानपदाखाली रंगणाऱ्या टी-२० वर्ल्डकप स्पर्धेसाठी अमेरिकेच्या क्रिकेट संघाची घोषणा करण्यात आली आहे. अमेरिकेचा संघ भाराताविरुद्ध वानखेडेच्या मैदानातून ७ फेब्रुवारीला आपल्या वर्ल्डकप मोहिमेची सुरुवात करणार आहे. अमेरिकेचा संघ जाहीर करण्यात आल्यावर कॅप्टनचे गुजरात कनेक्शन आणि वर्ल्डकप संघात पुन्हा एकदा सॉफ्टवेअर इंजिनिअरची झालेली निवड चर्चेचा विषय ठरत आहे.

अमेरिकेच्या संघाने टी-२० विश्वचषक २०२४ स्पर्धेत सुपर ८ फेरीपर्यंत मजल मारली होती. याच जोरावर त्यांना यंदाच्या टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत थेट प्रवेश मिळाला आहे. यंदाच्या हंगामातील स्पर्धेसाठी अमेरिकेच्या संघाने भारतीय वंशाच्या गुजरातमध्ये जन्मलेला मोनांक पटेल याच्याकडे नेतृत्व सोपवले आहे. या संघात एकूण १० खेळाडू असे आहेत, जे मागील विश्वचषकातही संघाचा भाग होते.

टी-२० विश्वचषक २०२६ स्पर्धेसाठी अमेरिकन संघात पुन्हा एकदा सॉफ्टवेअर इंजिनिअर सौरभ नेत्रवालकर मैदानात उतरल्याचे पहायला मिळणार आहे. हा खेळाडू मुंबईत जन्मला असून तो आयआयटी बॉम्बेचा पदवीधर आहे. अमिरेकेत स्थायिक झाल्यामुळे तो तेथील क्रिकेट संघाचे प्रतिनिधीत्व करतो. गत टी-२० विश्वचषक स्पर्धेत त्याने गोलंदाजीत खास छापही सोडली होती. आता या वेळी जन्मभूमीत चमक दाखवण्यासाठी तो प्रयत्नशील असेल. याशिवाय अमेरिकेच्या संघात मोहम्मद मोहसिन आणि शेहान जयसूर्या यांना पहिल्यांदाच विश्वचषकासाठी संधी देण्यात आली आहे.

### टी-२० वर्ल्डकप

## पंच, मॅच रेफरींच्या पॅनलची नियुक्ती

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत-श्रीलंका यांच्या संयुक्त यजमानपदाखाली टी-२० वर्ल्डकप स्पर्धेच्या १०व्या हंगामाला ७ फेब्रुवारीपासून सुरुवात होणार आहे. आंतरारष्ट्रीय क्रिकेट परिषदेकडून या स्पर्धेसाठी पंच आणि सामनाधिकाऱ्यांच्या पॅनलची अधिकृत घोषणा केली आहे.

पाकिस्तान आणि नेदरलंड्सच्या यांच्यातील सलामीच्या लढतीत श्रीलंकेचे कुमार धर्मसेना आणि न्यूझीलंडचे वेन नाइट्स हे मैदानातील पंचगिरी करताना दिसतील. याच दिवशी भारतीय संघ आपला पहिला सामना अमेरिकेविरुद्ध खेळणार आहे. या लढतीत पॉल रीफेल आणि रॉड टकर हे मैदानी पंच म्हणून काम पाहणार आहेत. टी-२० वर्ल्डकप स्पर्धेतील साखळी फेरीत ७ ते २० फेब्रुवारीदरम्यान एकूण ४० सामने खेळवले जाणार आहेत. यात एकूण २४ पंच मैदानावर काम पाहणार आहेत. सुपर-८ तसेच सेमीफायनल आणि फायनलसाठी पंचांची घोषणा नंतर करण्यात येईल.

## खोपोलीत आज आंतर शालेय मैदानी स्पर्धा

**खोपोली : प्रतिनिधी**

यशवंती हायकर्स आणि विक्रम साबळे फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने खालापूर तालुक्यातील आंतर शालेय मैदानी स्पर्धेचे भव्य आयोजन खोपोली येथे करण्यात आले आहे. जनता विद्यालयाच्या पंत पाटणकर क्रीडांगणावर १ फेब्रुवारी रोजी ही स्पर्धा रंगणार आहे.

स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाला नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे, राष्ट्रीय खेळाडू उदय साखरे, नगर परिषदेचे उपाध्यक्ष तथा विक्रम साबळे फाउंडेशनचे अध्यक्ष विक्रम साबळे हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. जिल्हाभरातील नामवंत क्रीडापटू तसेच प्रशिक्षक हजर राहणार आहेत.

या संदर्भातील माहिती यशवंती हायकर्सचे अध्यक्ष मच्छिंद्र यादव, उपाध्यक्ष संदीप पाटील व सचिव महेंद्र भंडारे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना माहिती दिली. विक्रम साबळे फाउंडेशनच्या वतीने नेहमीच नवोदित खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी अनेकदा विविध स्पर्धांचे आयोजन केले आहे. यासाठी उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते यशवंत साबळे यांचे नियमित सहकार्य लाभत असल्याचे त्यांनी सांगितले.

## शिस्तभंगामुळे मनप्रीतसह तिघे राष्ट्रीय हॉकी संघाबाहेर?

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



भारतीय हॉकी संघाचा अनुभवी मध्यरक्षक मनप्रीत सिंगसह तीन खेळाडूंना आगामी 'एफआयएच' प्रो लीगसाठीच्या संभाव्य खेळाडूंच्या यादीतून वगळण्याचा निर्णय गंभीर शिस्तभंगाच्या कारणामुळे घेण्यात आल्याचे समोर आले आहे. डिसेंबरमध्ये झालेल्या दक्षिण आफ्रिका दौर्यातील गैरवर्तनामुळे हा निर्णय घेण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले.

प्रो लीगमध्ये भारताचा पहिला सामना ११ फेब्रुवारी रोजी बेल्जियमविरुद्ध होणार आहे. त्याआधी १ ते ७ फेब्रुवारीदरम्यान होणार्या राष्ट्रीय शिबिरासाठी संभाव्य ३३ खेळाडूंच्या यादीत मनप्रीत, दिलप्रीत सिंग आणि गोलरक्षक कृष्ण बहादूर पाठक यांना स्थान देण्यात आलेले नाही.

गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये दक्षिण आफ्रिकेतील तीन कसोटी सामन्यांच्या मालिकेत भारतीय हॉकी संघाला दोन सामन्यांत पराभव पत्करावा लागला, तर एक सामना अनिर्णित राहिला होता. या दौऱ्यादरम्यान एका खेळाडूच्या शिस्तभंगाचा गंभीर प्रकार उघडकीस आला होता. संबंधित खेळाडू संघाच्या बैठकीस अनुपस्थित राहिला. मनप्रीत, दिलप्रीत आणि पाठक यांनी त्याला प्रतिबंधित पदार्थ असलेली 'च्युइंग गम' दिली होती, ज्यामुळे त्याची प्रकृती खालावली आणि तो बेशुद्ध झाला, असे चौकशीत समोर आल्याचे आता सूत्रांनी सांगितले आहे.

त्या खेळाडूला रात्रभर वैद्यकीय देखरेखीखाली ठेवावे लागले, तसेच दुसऱ्या दिवशीही तो संघ बैठकीस उपस्थित राहू शकला नाही. या घटनेनंतर संबंधित खेळाडूंनी माफी मागितली असली तरी संघ व्यवस्थापनाने कठोर कारवाई करताना त्यांना संभाव्य यादीतून वगळण्याचा निर्णय घेतला.

## आयर्लंडच्या खेळाडूने मोडला रोहितचा विक्रम

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



रोहित शर्माने त्याच्या कारकिर्दीत अनेक विक्रमांना गवसणी घातली आहे, पण आता रोहितचा सर्वाधिक टी-२० सामने खेळण्याचा विक्रम आयर्लंडच्या ३५ वर्षीय खेळाडूने हा विश्वविक्रम मोडला आहे.

आयर्लंडचा कर्णधार आणि सलामीवीर फलंदाज पॉल स्टर्लिंग युएईविरुद्धच्या पहिल्या टी-२० सामन्यात खेळायला उतरताच त्याने हा ऐतिहासिक पराक्रम केला. रोहित शर्माने २००७मध्ये आपल्या टी-२० कारकिर्दीला सुरुवात केली होती आणि २०२४चा टी-२० विश्वचषक जिंकल्यानंतर या फॉरमॅटमधून निवृत्ती घेतली. रोहितने त्याच्या १७ वर्षांच्या कारकिर्दीत १५९ टी-२० सामने खेळले. जवळजवळ दोन वर्षांनंतर हा विक्रम आता मोडला गेला आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com